प्रकरण - चौथे

समकालीन कविता आणि नारायण सुमंतांची कविता

इ.स.१९८० च्या दरम्यान मराठी ग्रामीण कवितेत अनेक कवी लिहिते झालेले दिसतात. ग्रामीण भागातील शिक्षितांना आपल्या समस्यांची जाणीव झाली. ही जाणीव होण्यास शिक्षणाचा प्रसारही कारणीभूत ठरला. वेगवेगळ्या भागातले कवी आपल्या भावभावना कवितेद्वारे व्यक्त करू लागले. त्यामुळे साहजिकच मराठी कवितेला अधिकच समृद्धी प्राप्त झाली. या वेगवेगळ्या भागातील कवींच्या वेगवेगळ्या समस्या होत्या. त्यांची काही प्रादेशिक वैशिष्टये होती. त्याचप्रमाणे त्यांची बोली, त्यांच्या परंपरा वेगळ्या होत्या. या सर्वांचे प्रतिबिंब या कवितेमध्ये पडलेले दिसते. या नारायण सुमंतसमकालीन विठ्ठल वाघ, नारायण कुलकर्णी - कवठेकर, उत्तम कोळगावकर, मोहन पाटील, फ.म.शहाजिंदे, इंद्रजीत भालेराव, प्रदीप पाटील, श्रीकांत देशमुख आदी कवींच्या कवितांचा आढावा घेऊ व त्यामध्ये नारायण सुमंत यांचे वेगळेपण आपण शोधू.

विठ्ठल वाघ

इ.स.१९८० नंतरच्या मराठी कवितेतील एक महत्वाचे कवी म्हणून विठ्ठल वाघांचा उल्लेख केला जातो. व-हाडी प्रांतातील ह्या कवीने आपल्या वेगळेपणाने मराठीमध्ये वेगळा ठसा उमटवून ठेवला. 'काया मातीत मातीत', *वैदर्भी, साय* हे त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. खास ग्रामीण शैलीत ते आपला अनुभव कवितेत चितारतात. निसर्ग प्रतिमातून शृंगाराचे वर्णन करणे ही त्यांची खासियत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या अनेक कविता आहेत. *भरम* या कवितेत स्त्री सौंदर्य व प्रियकर, प्रेयसी प्रेमभावाचे चित्रण येते. तिच्या गालावरचा तीळ, तिचा चंद्रासारखा दिसणारा चेहरा व पुनवेच्या रात्रीला तिचे आगमन प्रियकराला चंद्रासारखे वाटणे इ. भाव व्यक्त होतात.

बिल्लोर या कवितेत नववधूला चिडवणा-या बायका, नववधूची पहिल्या रात्रीची भावअवस्था यांचे वर्णन येते. *लवंग* मधील नायिका पान-लवंगाच्या प्रतिमेतून आपले मीलनोत्सुक मन व्यक्त करते.

प्रेमकविते प्रमाणेच वास्तव ग्रामीण जीवनाचे चित्रणही कवी करताना दिसतो. त्यांच्या *तिफन* या प्रसिद्ध कवितेत पेरणी या कृषिवर्षातील प्रथम व अत्यंत महत्वपूर्ण अशा प्रसंगाचे चित्रण येते. भर पावसात

पेरणी करणारे शेतकरी पती-पत्नी, झाडाच्या आडोशाला त्यांचं झोपलेलं तान्हुले, पेरणी करताना पायात घुसणारा काटा. या सर्वांचे सजीव चित्र आपल्या डोळ्यासमोर उभे राहते.

काही कवितांमधून राजकीय भ्रष्टाचारावरही बोट ठेवले जाते. *ऋतू* या कवितेत निसर्गाच्या व राजकारण्यांच्या अवकृपेमुळे शेतकरीवर्गाची झालेली दयनीय अवस्था चित्रित होते.

आजून या कवितेत उन्हात, कष्ट दारिद्र्यात खंगत चाललेल्या शेतकरी वर्गाला फक्त आश्वासनाचे चंद्रच मिळतात. ही खंत व्यक्त केली जाते. *मेंढर* या कवितेत ग्रामीण जनतेची मेंढरासारखी झालेली अवस्था चित्रित होते. त्याचप्रमाणे *साहेबराव पाटील* ही एका सत्य घटनेवरील कविताही लक्षणीय आहे.

विठ्ठल वाघांच्या कवितेत अशा प्रकारे शृंगार, शेतीवर्णन, ग्रामजीवन व भ्रष्ट राजकारण्यांचे दर्शन घडते. ग्रामीण जीवनाचा चहु बाजूने वेध घेणारी ही कविता आहे. गेयता हा तिचा एक विशेष गुण आहे. त्याचबरोबर लोकपरंपरेचे दर्शन ही कविता घडवते. व-हाडी भाषेचा बाज या कवितेला लाभलेला आहे. मराठी कवितेत आगळे वेगळे स्थान निर्माण करणारा हा कवी आहे.

नारायण कुलकर्णी - कवठेकर

ग्रामीण जीवन व सामाजिक जीवन यांचे चांगले भान असणारा हा एक कवी. इ.स.१९८० साली ग्रंथाली वाचक चळवळीने *कविता दशकाची* हा दहा कवींच्या कवितांचा प्रातिनिधीक संग्रह प्रसिद्ध केला होता. त्यामध्ये नारायण कुलकर्णी - कवठेकरांच्या दहा कवितांचा समावेश आहे. *हे माझ्या गर्वताच्या पात्या* हा त्यांचा पहिला कविता संग्रह ऑगस्ट,१९८२ मध्ये मौज प्रकाशन गृहाने प्रकाशित केला. सामाजिक वास्तव व ग्रामीण जीवनानुभव या कवितेने समर्थतेने चितारला आहे.

सामोरी या कवितेत दुष्काळाच्या वणव्यामध्ये एका गरीब कुटुंबातील स्त्री व पुरुष दुष्काळ व गरिबीमुळे किती हतबल झाले आहेत याचे चित्रण येते. या परिस्थितीपुढे ते शरणागती पत्करतात व आपले स्वत्व गमवून बसतात. मोडक्यातोडक्या कुडाच्या झोपडीत तिच्यामध्ये, त्याच्यामध्ये व डब्यामध्येही पोकळी आहे. निराशतेने अंगठा तुटलेली वहाण पायात अडकवून तो गुमान अत्यंत लांबच्या वाटेने निघून जातो. त्यावेळी ती मात्र कोनाड्यातल्या कुठल्याशा देवीचा फोटो उलटा करते, डोईवरला पदर खांद्यावर आणते-

आणि येते बाहेर झोपडीच्या
दुष्काळाच्या चवचाल हवेला
सामोरी जात[१]

संबंध या कवितेतही नियती व गरिबी यामुळे बाप-लेकात निर्माण होणा-या तणावाचे चित्रण कवी करतो. चोरानी शेतातली कणसं खुडून नेली. नियतीच्या विनोदातून राहिलेली दोन मण ज्वारी पोरगं घरात घेऊन येतं त्यावेळी बाप घर विकायच्या बेतात होता. या परिस्थितीत तो भडकतो. पोरग्यावर सगळा राग काढतो. माणूसपण अंगठीत तोलणा-या व तिन्ही त्रिकाळ तुक्याचे अभंग म्हणणा-या सरड्यारुपी बापाचा राग पोराला येतो आणि

डोळ्यांत मिरचीची पूड तशी आईच्या पिचत मरण्याची आठवण...

एका क्षणात तडकून गेले माझे डोळे आणि

बापाचा जबडा केंव्हा तुटून आला माझ्या हाती हे मला कळलेही नाही. [२]

गाव कवितेत सालदार, महिनदार, हाडकुळ्या गायी, शिंगे मोडलेला बैल, व्याकुळ झोपड्या, गावाचे विदीर्ण कप्पे, सा-यांचे दारिद्रयाचे व उन्हाने ग्रासलेले चित्र मांडलेले आहे. यातील अंगावर तापलेल्या लोहपट्टयासारख्या झळा वागवीत पोकळ गल्ल्यातून हिंडणारी दुपार, बुरशी चढलेल्या भाकरी, माणसांचे माणसांसारखेच चित्रविचित्र चेहरे, शरमून बुडून जाण्याची बडबड करणारा सूर्य, चहाटळ चांदण्या, गाणी म्हणत असल्यासारखा चिडून वाहणारा वारा, डोळ्यातली धूळ दुर्लक्षून सैरावैरा धावणा-या बाया, पोटाशी पाय आखडून घेणारी माणसे, कोठ्यातल्या आजारासारखी तंगड्या फाकून पडलेली पोरे, डालग्यातल्या पिल्लांसाठी दावे ओढीत बॅ ऽ बॅ ऽ करणारी ऽबकरी, खिडक्या दरवाजाशी फारकत घेतलेल्या भिंती, टिचलेला अन फुल्या मारलेला सूर्य व चंद्राचा चेहरा, पाहुण्या पोरासारखा घरभर हुंदडणारा सुगीचा वारा, पारावरल्या मारुतीला शेंदुराची शपथ घालून शिवारभर विखुरणारी माणसे या सा-या गोष्टी माणसे, घरे, जनावरे-एकूणच सा-या समाजजीवनाला दारिद्रयाचा गंध देतात. खेडेगावातील दारिद्रयाचा, दुष्काळाचा होणारा सर्वच घटकांवर परिणाम याचा आलेख ही कविता मांडते.

जमीन या कवितेमध्येही गरीब जातीमध्ये पारधी, वडारी, वैदू, डोंबारी यांच्या वस्त्यामधील राहणीमान, वासनामध्ये बुडून माणुसकी सोडून आपले दुःख विसरण्यासाठी मारझोड करणारे पुरुष, मायबापाच्या भांडणात केविलवाणी पोरं, सकाळी उठून पुन्हा कामावर जाणारे स्त्री-पुरुष व दुपारी घरामध्ये भिंतीवरील जुन्या कॅलेंडरातीच्या चित्रातील सिंहाचे दात मोजणारी मुलं यांच्याद्वारे कवी त्या समाजाचे चित्र रेखाटतो.

शत्रू या कवितेत शेतक-याच्या वाट्याला आलेली आजच्या काळातील तुच्छता, भिषणता मांडली जाते. शेतक-याला आपल्या शेती कामासाठी तालुक्याच्या ऑफिसात जावे लागते. पण तेथील

साहेबापासून चपराशी लोकांपर्यंत त्याचा स्वाभिमान तुडविला जातो. त्यावेळी त्या शेतक-याला पुन्हा आपल्या गावी जाण्याची हिंमत होत नाही. म्हणून तो एखाद्या निर्जन गावी झाडाला पटका बांधून गळफास लावून घेतो. त्यावेळी मात्र त्या शेवटच्या क्षणी त्याच्या डोळ्यात विद्वेष असतो व त्याच्या ओठावर त्या साहेब, बाबू, चपराशी यांना उद्देशून दिलेल्या शिव्या असतात.

नंदीबैल ही नारायण कुलकर्णी-कवठेकरांची गाजलेली कविता. १९८० व ९० या जवळपास १५ वर्षांच्या काळात अनेक साहित्यसंमेलने व काव्यसंमेलनामध्ये कवीने ही कविता म्हटली व एक काळ गाजविला. ही कविता ऐकताना श्रोत्यांनाही कैफ चढत होता असे अनेकजण सांगतात. या कवितेत आजच्या संवेदनशील, स्वाभिमान, पौरुषत्व, कणखरपणा हरवून बसलेल्या स्वार्थी, ढोंगी राजकारण्याचं हुबेहुबं चित्र रंगवले आहे. बैलाचा गुणधर्म नसलेले हे नंदीबैल पाठीवर खडा पडताच कातडी थरारणारी संवेदनशीलता, शिंगावर चिखलाचा घोस तु-यासारखा मिरविणारी रग, गायीचा यारा दिसताच डरकाळणारे पौरुषत्व आणि मेघांच्या गडगडाटाला प्रत्युत्तर म्हणून नागाच्या फण्यासारखे शेपट्या उंचावून उंडारण्याचे चैतन्य हरवून बसलेले आहेत. कारण सत्तेच्या लालसेने ते आपलं स्वत्व गमावून बसले आहेत. बायाबापड्यांकडून ओवाळून घेतल्यावर मिळालेल्या पसाभरात ते समाधानी होतात. गुबूगुबू वाजताच तडफेने मान हलवितात. अशी उपहासात्मक टीका कवी सध्याच्या राजकारण्यांवर करतो.

झाड या कवितेतील झाडाच्या प्रतिमेतून देश, समाजव्यवस्था, विविध पक्ष नेते, विचारवंत ही साखळी मांडली जाते. कीड लागलेली नि:सत्व फळे, गंधहीन फुले असलेले हे झाड काही दिवसापूर्वी स्वस्थ, सुंदर होते. पण एका रात्रीच्या बैराग्याच्या मुक्कामाने त्याच्यात बदल होतो. नंतर मात्र झाडाची पाने सुरकुतलेली होतात. फांद्या वाकड्या होतात. वारा वाहिला तर हाड फुंकल्याचा आवाज त्यातून येतो. आता फक्त अजाण अन नवे प्रवासी या झाडाखाली बसतात. या कीड लागलेल्या झाडावर पाखरांना बसू देवू नका असे कवी आवाहन करतो. झाडाची प्रतिमा वापरून कवी सद्य:स्थितीवर प्रकाश टाकतो.

प्रतिमांचा सशक्त वापर कवी करताना दिसतो. *सामोरी* कवितेत म्हाता-या आभाळासारखी कमरेत दुखावलेली कुडाची झोपडी, स्वत:च पेटल्यागत टेंभलणारा सूर्य, अशा प्रतिमा कवी वापरतो. *जमीन* मध्ये बाया हवेपेक्षा झपझप चालतात. पुरुष लव्हाळीपेक्षा लवलव वाकतात. *संबंध* कवितेत डोळ्यात मिरचीची पूड तशी आईच्या मरणाची आठवण. तर *गाव* कवितेत खिडक्या दरवाजाशी फारकत घेतलेल्या भिंती, टिचलेला आणि फुल्या मारलेला सूर्य व चंद्र, पाहुण्या पोरासारखा घरभर हुंदडणारा वारा, तर *शत्रू* या कवितेत शेतक-याच्या स्वाभिमानासाठी पटका हे प्रतिक कवी वापरतो. *नंदीबैल* कवितेत स्वाभिमानशून्य राजकारणी

लोकांचे प्रतिक म्हणून कवीने नंदीबैल उभा केला आहे. *झाड* ही प्रतिमाही सद्य:स्थिती चितारण्यासाठी वापरली आहे.

नारायण कुलकर्णी-कवठेकरांचा दुसरा कविता संग्रह 'मागील पानावरून पुढे सुरु' (१९९७) हाही मौज प्रकाशन गृहाने प्रकाशित केला आहे. त्यात अग्दी थोड्याच कविता ग्रामीण जीवन रेखाटणा-या आहेत.

नागडी दु:खं ही त्यातली एक. ग्रामीण भागात असणारं दु:ख त्यातच नेतेमंडळींची खोटी आश्वासनं व त्यात शेतक-याच्या स्वप्नांचा होणारा चक्काचुर याचं चित्रण ही कविता करते. दु:ख नंग्याच्या खोपटातून येतात व बिलगतात. तेंव्हा जिवंत माणसं मुकी सुतक असल्यासारखी झाडाखाली पाय पसरून उदासवाणी बसून राहतात. त्यांची पोरं स्वप्नांच्या मोरपिसांना चिटकवण्यासाठी डिंक शोधत रानोमाळ फिरतात. त्यावेळी हे नेते येतात. कुंथल्यासारखं गातात. पण त्यांच्या भाषणातला भिलाई, भास्कर, गावस्कर, ताजमहाल हे काही त्यांना कळत नाही. त्यांच्या ॲल्युमिनियमच्या थाळ्या रिकाम्याच राहतात. ते ईळंन ईळ चावडीवर बसून राहतात. भोवती मात्र जुनेच अभिनव उत्सव चालू असतात. अखेर चार ग्रोरं शेवटी त्यांच्या स्वप्नांना खांदा देवून निघून जातात. त्यावेळी गल्लीतून हातातून मडकं घेऊन हे नेते येतात. राजकारणात सर्वसामान्य लोकांचा पडणारा बळी कवी येथे रेखाटतो.

असेच *निभाव* या कवितेत खेडेगावतल्या परिस्थितीच्या बोजाखाली वाकलेल्या तरुणाची कहाणी येते. डांबरी रस्त्याच्या रोजगार हमीच्या कामावर हा तरुण दिवसभर मस्टरमध्ये खोटी नावे लिहीत राहतो. त्याचा चेहरा करपलेल्या भाकरीसारखा होतो. खरं तर त्याला जीवनाबद्दल काही कळत नसते. तरीही सकाळी थंडवारा, कोंबड्याची बांग, बैलांचा घागरमाळांचा आवाज, पाखरांचा कलकलाट, विहिरीवरच्या घागरी-पोह-यांची टणटण हाच त्याला विरंगुळा वाटतो. त्याला एवढे कळत असते की ही ताजी सकाळ - -हदयात भरून घेतल्या खेरीज दुपारच्या उन्हासमोर दम टिकणे कठीण आहे. परिस्थितीच्या भोव-यात अडकलेल्या तरुणाची ही कहाणी आहे.

'बळीराजा साठी गाणं' हे शेतक-याची जीवनकहाणी आहे. अस्मानी सुल्तानी संकटात सापडलेल्या शेतक-याची अवस्था बिकट आहे. तो तहसिलातून सुटतो पण कोर्टात अडकतो. जनावर सोडलं तर माणसं फाडतील. त्याची कणसं कोणीतरी खुडून नेईल. अशा वेळी ढोराच्या गळ्यात गळा घालून तो मनसोक्त रडून घेतो व आपल्या पाठीवर कोणाकोणाच्या बुटाचे ठसे आहेत हे त्याला विचारतो. त्यावेळी तो शेतकरी आपल्याच विहीरीत जीव देऊ पाहतो. त्यावेळी कवी त्याला अडवतो व म्हणतो तुझ्या

मरणाची सोय वरतीच केली आहे. तू एक तर पाणी-पाणी म्हणून मरशील किंवा धो-धो पावसात वाहून जाशील. समाजव्यवस्थेने शेतक-याची केलेली दयनीय स्थिती कवी येथे चित्रित करतो.

पण या कविता संग्रहातील काही कविता मात्र 'थिल्लरपणाकडे' झुकणा-या आहेत. यबद्दल टीका करताना श्रीकांत गोंधळेकर म्हणतात- 'साहित्यातून येणारं वर्णन तरी किमान सभ्यतेच्या, सुसंस्कृतपणाच्या सीमारेषा ओलांडणारं नसावं..... कवठेकरांसारख्या प्रतिथयश आणि प्रतिष्ठित प्राध्यापकांच्या साहित्यातून वाचायला मिळायला लागलं, तर त्यांच्या संस्कारक्षम विद्यार्थी आणि त्याच बुद्धिमत्तेच्या सामान्य वाचकांना, हेच खरं आणि योग्य आहे, असं वाटू लागेल.[३]

अर्थात नारायण कुलकर्णी-कवठेकर हे श्रेष्ठ दर्जाचे कवी आहेत यात शंकाच नाही. सशक्त प्रतिमा, जिवंत जीवनानुभव जळजळीत सत्य मांडण्याची निष्ठा, उपरोधपूर्ण शैली या गुणांनी त्यांचे काव्य समृद्ध झाले आहे. अर्थात त्यांचे अनुभवविश्व फक्त ग्रामीण नाही. तर ते राजकीय, सामाजिक वास्तवाचे भान ठेवून त्यावर जळजळीत भाष्य करताना दिसतात. त्यांची कविता मात्र रानात फिरताना दिसत नाही. ग्रामीण भागातील गाव याच्यावरच ते भाष्य करताना दिसतात. त्यांच्या कविता प्रमाण भाषेतून साकारतात त्यामुळे त्या सोप्या वाटतात. याबद्दल रविंद्र ठाकूर म्हणतात 'आकलनाच्या दृष्टीने ही कविता सोपी असली तरी तिच्याविषयी बोलणं, सरसकटपणे लिहीत जाणे अवघड आहे. कुठलाही एक शिक्का मारणं हे तर त्यातून अवघड आहे. सामाजिक, राजकीय क्षेत्रातील अनिष्ट प्रवृत्तींचा तीव्र उपरोध हे या कवितेचं प्रमुख वैशिष्ट्य आहे.[४]

राजकीय व सामाजिक भान कवठेकरांना चांगले होते. अर्थात ते आपल्या कवितेत रानाकडे वळले नाहीत, हेही तितकेच खरे. मात्र शेतक-यांवरील अन्याय ते प्रभावीपणे मांडतात. *शत्रू*, *बळीराजासाठी गाणं* यासारख्या कविता त्याचे उदाहरण आहे. नारायण सुमंत झाडाशी व शेताशी ज्या प्रमाणात एकरुप होतात. त्याप्रमाणे नारायण कुलकर्णी कवठेकर मात्र होत नाहीत. *झाड* ही एकमेव कविता नारायण सुमंताच्या कवितेची आठवण करून देते. पण तरीसुद्धा राजकीय व सामाजिक भान चांगले असणारा हा एक उच्च दर्जाचा कवी आहे.

उत्तम कोळगावकर

ग्रामीण जीवनाचे भान असलेला व ग्रामीण प्रतिमांचा वापर करणारा एक सजग कवी म्हणून उत्तम कोळगावकरांच्याकडे पहावे लागते. त्यांच्याही दहा कविता *कविता दशकाची* मध्ये प्रसिद्ध झाल्या होत्या. त्यानंतर त्यांचा स्वत:चा असा स्वतंत्र काव्यसंग्रह *जंगलझडी* या नावानें १९८२ साली मौज प्रकाशन गृहातर्फे प्रकाशित झाला. यातील सर्वच कविता ग्रामीण जीवनानुभव रेखाटणा-या नसल्यातरी मोजक्या कविता ग्रामीण जीवन चितारतात व ग्रामीण प्रतिमांचा सहज सुंदर वापर करतात.

कापलेली शेतं या कवितेत हंगाम संपल्यानंतरच्या एका शेताचं कवी वर्णन करतो. कापलेल्या शेतातून गवत काड्या कुरतडत फिरणा-या चार-दोन बक-या, काटेरी ढेंकळातून अडकून पडल्यागत वाहणारा फाटका वारा, झाडांखाली पाचोळ्याचा ढीगच ढीग आणि त्याखाली कण्हत पडलेलं, जीर्ण हिरवं गाणं. एक आटत चाललेला तलाव. हे सर्व पाहिल्यावर कवीच्या लक्षात येते की आपण हंगाम संपल्यानंतर आलो आहोत. शेवटी कवी परत येतो-

अखेर उन्हाचा फार मोठा वाळका भारा घेऊन
मला घरी यावं लागलं[५]

'चंद्र निघून जात असेल' मधील मी शहरात आला आहे. शहरातील रात्रीत तो एकाकी होत जातो. या एकाकी अवस्थेत तो घरच्या (गावाकडील) आठवणीत हरवून जातो. त्याला वाटतं गावातल्या घरापाशी चंद्र थांबला असेल, पोटातल्या काळोखाला कवटाळून आईच्या कुशीत भावंडं झोपली असतील. त्यावेळी-

त्यांच्या अंगावर हात फिरवून
शहाण्या माणसासारखा
चंद्र निघून जात असेल...[६]

गाव या कवितेत ओस पडत चाललेल्या गावाचे हृदयाल भिडणारे वर्णन कवी करतो. घरांना कुलुपं लावून आणि गाड्या भरभरून मुकाट लोक निघून गेले. गल्लीतला गजबजाट थांबला. गावाबाहेर तर खूप लोक ढोरांसहित चालले होते. कवी कुणालाच थांबवू शकत नाही. हताश होऊन घरी परततो. कवीच्या घराच्या खिडकीतून दिसणा-या पिंपळावरचे पक्षी ही हळूहळू नाहीसे झालेत. अशावेळी-

हळूहळू सगळंच गाव
ओस पडत चाललंय
माझं[७]

ते असं बघत राहणं फक्त कवीच्या हातात राहतं.

'म्हाता-याचं काळीज' या कवितेत वेड्या बाभुळात वाकलेला, थकलेला म्हातारा आपलं डुगडुगणारं धूड घेऊन काठी टेकत टेकत शेतावर येतो. सगळ्या शेतावर नजर टाकतो. त्यावेळी त्याला अनेक आठवणी येतात. मोटेचा कुईकुई ध्वनी, ढेकळातून जिरणारं जिवंत पाणी, केळीची घनदाट आणि लालभडक मिरचीचं थळं हे सर्व आठवतो व सभोवताली तो पाहतो तर फाटलेले शेत त्याला दिसतं व

म्हाता-याचं काळीज

पाण्याबाहेर काढलेल्या माशासारखं

तापलेल्या ढेकळांमध्ये

तडफडत उडत राहतं[८]

आई या विषयावर अनेक कवींनी कविता लिहिली आहे. त्याप्रमाणे कोळगावकरही करतात. खेडेगावातल्या आईचं चित्र कवी रेखाटतो. जेंव्हा आई उदास व्हायची त्यावेळी पोतारुन पोतारुन पांडुरक्या झालेल्या व पोपडे धरलेल्या भिंती सारखा चेहरा दिसत असे. अगदी लहान असल्यापासून आई दुपारी दाराशी बसून जिवाभावाच्या आईबाईजवळ मनातलं काहीतरी सांगायची. डोळ्याला पदर लावायची. रात्री भाकरी थापताना ओलं जळण फुंकताना तिची होणारी दमछाक कवी पाहायचा व तिला मदत करायचा. नंतर अंधारात हा मुलगा भाकरी थापणा-या आईची सावली पाहत एकटक पाहत रहायचा आणि

तिच्यासाठी मनात

खूप काही ठरविताना

हरवून जायचो[९]

माती कवितेत कॉंक्रीटच्या जंगलात आपण जपून ठेवलेली माती, जी डोंगर उतरताना हात घट्ट धरणा-या त्याच्या बालमित्राच्या हातासारखी आहे ती सांभाळून ठेवायला या शहरात जागाच नाही याची खंत कवी करतो.

बाप या कवितेत व्यसनी बापाच्या व्यसनामुळे केविलवाण्या झालेल्या मुलाचे चित्रण येते. दारू पिलेल्या बापाला तो घरून आणतो. त्यावेळी त्याचे डोळे तांबरलेले असतात. तर तोंडातून दारूचा असह्य दर्प येत असतो. त्यावेळी या पोराला बापाला तसाच टाकून पळून जावसं वाटतं. पण आईचा उन्हात झिजलेला चेहरा आठवतो व तो बापाला आधार देत आणतो. त्यावेळी गल्लीतले आजूबाजूचे सर्व पाहत असतात, हसत असतात, पोरं पाठी लागलेली असतात अशावेळी तो पोरगा आजूबाजूला मुळीच बघत नाही.

स्वत:ला स्वत:भोवती

घट्ट पांघरण्याचा

प्रयत्न करतो.[१०]

कोळगांवकर आपलं अपेक्षाभंगाचं दु:खही ग्रामीण प्रतिमातूनच व्यक्त करताना दिसतात. कवी म्हणतो हे सगळं असंच चालतं. धूळच पांघरुन वारं वाहतं. ढगांची सावली आली म्हणून पेरणीला लागावं आणि बैलानं एकाएकी मरून पडावं. भुईमूग भरमसाट यावा आणि त्यावर उपाशी ढोरांचा कळप चरून जावा. पाण्याच्या आशेनं खोदत जावं आणि हाती मात्र खडकच लागावा असे कवीला वाटते म्हणून कवी म्हणतो-

हे सगळं असंच चालतं

राघूचं गाणंही काळीज कापतं[११]

आपले एकटेपणही कवी अशाच प्रकारे ग्रामीण प्रतिमेतून व्यक्त करतो. तो म्हणतो-

तांड्यामागून तांडे निघून जावेत

दुष्काळग्रस्त गावातून

पोटापाण्यासाठी.....

तसा मी ओस पडतोय[१२]

आपले एकाकीपण, आपले दु:ख अशाच प्रकारे निसर्ग प्रतिमांतून कवी व्यक्त करताना दिसतो.

या प्रदेशात माझं येणं अटळपण झालेलं

आता खूप धडपडतो बाहेर पडण्यासाठी

पण बाहेर पडू शकत नाही; उलट

या धडपडीत पडझड होते आतोनात

आणि मी रक्ताळून पुन्हा पुन्हा परततो

याच प्रदेशात[१३]

म्हणजेच येथे एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे कोळगावकर ग्रामीण जीवन आपल्या काव्यातून काही प्रमाणात चित्रित करतातच पण त्याचबरोबर मनाचे एकटेपण, तुटलेपण, उदासी ग्रामीण जीवनातील प्रतिबिंबाद्वारेच प्रतिबिंबित करतात. ते ज्या प्रतिमा वापरतात त्या अधिक सकस असतात. उदा.आई कवितेतील आईचा चेहरा पोतारून पोतारून पांढुरक्या झालेल्या व पोपडे पडलेला उदास भिंतीसारखा आहे.

असे वर्णन कवी करतो. तर *बाप* कवितेतही आईचा उन्हात झिजलेला चेहरा त्या पोराला आठवतो. या प्रतिमा काळजात घर करून जातात. त्याचप्रमाणे आपलं अपेक्षाभंगाचं दु:ख प्रकट करण्यासाठी कवी 'हे सगळं असंच चालतं' या कवितेत वेगवेगळ्या ग्रामीण प्रतिमातून ते चित्रण करतात.

कोळगावकरांच्या बद्दल रविंद्र ठाकूर म्हणतात 'पहिल्यांदा हे लक्षात घेतले पाहिजे की, हा कवी काही ग्रामीण अनुभव व्यक्त करीत असला तरी आणि त्याच्या शब्दसृष्टीत ग्रामीण शब्द व प्रतिमांचा फार मोठा आढळ होत असला तरी हा कवी काही ग्रामीण कवी नाही.'[१४]

तर आनंद यादव ही या कवीला ग्रामीण कवी न मानता जानपद कवितेचा नवा अवतार मानतात.[१५] यामध्ये ठाकूर यांचे म्हणणे अधिक बरोबर वाटते.

नारायण सुमंत यांच्याशी तुलना करताना एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे सतीश कोळगावकरांना ग्रामीण जीवनानुभव खोल प्रमाणात प्रकट करता येत नाही. ते आपले विचार ग्रामीण प्रतिमातून व्यक्त करतात. परंतु ती ग्रामीण जीवनानुभूती नसते.

पण ते आपल्या कवितेत आपल्या भावना अभिव्यक्त करतात. त्याला उच्च पातळीवर अविष्कारतात. त्यांनी मानवी जीवनातील एकटेपण, तुटलेपण, केविलवाणी परिस्थिती मोठ्या ताकदीने ग्रामीण प्रतिमांच्या सहाय्याने प्रकट केली आहे. त्यांच्या प्रतिमांच्यात नाविण्यही आढळते. त्यामुळे हा एक चांगल्या दर्जाचा प्रतिभावंत कवी आहे हे मानावे लागते. आकृतिबंध, अविष्कार तंत्र, आशयामध्ये ही कविता नारायण सुमंत यांच्यापेक्षा वेगळी वाटते.

मोहन पाटील

'गाव आणि मातेच्या कविता' (१९८२) हा मोहन पाटील यांचा काव्यसंग्रह प्रसिध्द आहे. ग्रामीण जीवन आपल्या काव्यातून प्रकट करणारे हे एक कवी आहेत. हा काव्यसंग्रह दोन विभागात विभागला गेला आहे. पहिला विभाग 'गावाच्या कविता' तर दुसरा 'मातेच्या कविता' हा विभाग आहे. प्रत्येकी एकोणीस कविता प्रत्येक विभागात आहेत.

गाव या कवितेत कवी गावाकडील आठवणीत दंग होतो. गावातील पडलेला पिंपळाचा पार, त्याची दाट छाया, तेथेच असणारा उभा शेंदरा मारूती, त्याची गावावर असणारी माया, निळ्या ओढयाची गावभर गुंजत राहणारी शीळ, गावात कधीही खंडीत न होणारा रात्रीच्या वेळेचा भजन नाद, गावातील स्त्रियांचे डोळे हुंदक्यांनी भरून हितगुज बोलणे या सर्व आठवणी कवीच्या मनात उभ्या राहणाऱ्या या आठवणीतूनच-

दाट धुक्याच्या थराची

गावकुस उसवते[१६]

प्रेयसीचे दर्शनही कवी ग्रामीण सूचक संदर्भातून उभे करतो. *तू* या कवितेत कवी म्हणतो सांज मिटल्या चिंब बनातून गुरांचे कळप वळतात. अलवार उन्हाळी मातीवर या गावाकडे वळणाऱ्या गुरांच्या खुरांच्या फौजा उमटतात. त्यावेळी कवी सावलीचा आडोसा धरून आकाशामध्ये नजर टाकतो. त्यावेळी बगळ्यांचा थवा आकाशातून जाताना दिसतो. कवी वरती पहात असताना त्याला आपली प्रेयसी दिसते तिचं दर्शन कवीला इतकं मोहतं की त्याला प्रेयसी भासते.

ढगाआडून उमलणाऱ्या

चांदणी सारखी[१७]

असेच मनात साठणाऱ्या पावसाचे रूप कवी रेखाटताना दिसतो. थेंब थेंब पाऊस कौलात साचतो. त्याचा ओलाचिंब दहिवर वळचणीवर सांडतो. घरामध्ये कुंद असे वातावरण आहे. तर बाहेर सुन्न झुळुक आहे. बंद मिटल्या दाराआड रात झुंजकारते आहे. उरामध्ये अंतरमन फुटत आहे तर ओढ कौलाखाली लागली आहे. ओलागार वळचणथेंब गालावर गोड खळी उमटवतो त्यावेळी कवीला वाटते.

थेंब थेंब पाऊस साचतोय कौलात

थेंब थेंब पाझरावा तसाच हृदयात[१८]

दोन झाडांचे वर्णन कवी एका कवितेत करतो. दिशाहीन कललेली दोन झाडे मुळांची गुंतावण सोडवून लांबवर पसरलेली आहेत. पानगळीच्या ऐन हंगामात उरलेल्या पानांना चांदण्याचे डोळे लावून त्यांनी सुख साजरे केले. झाड उंच झाले 'क्षितिज व माथ्यावर ढगांचे स्वप्न मिरवायला सज्ज झाले त्यावेळी त्या झाडाच्या बुंध्यालगत लाकूडतोड्यांची दाटी झाली. त्यांच्या अणकुचीदार कु-हाड पात्यांना दांड्याचा आधार द्यायला फांद्यातून होकार उमटला आणि

अशी जगावेगळी दोन झाडे

वेगळ्या जागी विस्तारताहेत[१९]

मातेच्या कविता यामध्ये एका मातेने आपल्या क्रांतीकारी मुलासाठी फोडलेला टाहो आहे. तिचा क्रांतीकारक मुलगा तिला सोडून गेलाय. त्याला उद्देशून केलेले हे मनोगत आहे.

ती म्हणते तुझ्यासाठी मी पीक केले आता कणसात दाणे भरू लागलेत. आता तू कुठे आहेस? आभाळात मीच तुझ्यासाठी चंद्र राखून ठेवला आहे. ओटीत चांदणं साठवून ठेवलं आहे. रात्रभर उशाशी

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

दिवा जाळून तुझ्या आठवणी उजाळल्या आहेत. आता दिवसाउजेडी तरी तू ये. पीकात उभी राहून पीक झाले. माती व्हावं वाटलं. माझ्यातून तू उभारलास, वाढलास, फुललास-फळारलास, आता तू नाहीस म्हणून माती व्हावंस वाटत नाही. त्या जुन्या आठवणीही तिला येतात. आपला मुलगा *नारळा* ला *नाळर* म्हणायचा, हेही तिला आठवते. तुला पेरताना बाहेर काळोख होता. तुला साठवताना मी उमलत होते ती म्हणते-

तुला जन्म दिला

ती खूण

वासनेलगतच गोंदली आहे

भरल्यापोटी सहज म्हणून आठवण झाली

तर नाव घेत जा[२०]

तुझं रक्त दुपारी पेटायचं. चौकात रक्तरांगोळी ओघळायची, उग्र होऊन चौका-चौकात गुरगुरायचास. पण तिला हे सहन व्हायचं नाही. रक्त सांडून मिळालेले घास मला नको आहेत असे ती म्हणते-

तू माझाच, म्हणून मला गोड

तू माझाच म्हणून मला वेड

तुझ्यात माझं रक्त, म्हणून मला प्रीती

तुझ्यात माझं रक्त, म्हणून मला भिती[२१]

ज्या दिवशी तो गेला तिला तो दिवस आठवतो. त्याच्या खांद्यावर भार देऊन कामगार स्तब्ध बसले होते. 'तर टाळा मिटून गप कारखाना बसला होता. त्याला समानता हवी होती. तो वाद खेळला. तिला आता एकच हवे आहे ते म्हणजे तू एकदाचा विश्व भरून शांत व्हावास. आता पिकाची नासाडी चालू आहे. बुजगावण्यांनी थैमान घातले आहे. तू गाव सोडून मुलुखभर पसरलास. एक दिवस मी गाव हरवून बसेन तुझ्यासाठी काय व्हायचं ते होऊन घालेन. पायातले काटे मस्तकापर्यंत रुततील. कधीतरी भेटून मला 'माझी' म्हणालास तर अंगभर सुंदर फुलं उमलतील. तुला जवळ घ्यावं, तुला न्याहाळावं, तुला हृदय भरून गोंजारावं असं मला खूप वाटतं. तू येशील तो दिवस सोन्याचा होईल. मग तुझा इतिहास खोदेन, जगभर सगळ्याच मातीवर आताशा झोपून असे. डोळे पेंगुळलेत, शब्द लडबडतात, मला आता दिवसा स्वप्न

दिसते. काळ्या अंधारातून एक रत्नाळ तारा जवळ येतो. माझी क्षमा मागतो. काही कळत नाही अशा अवस्थेत शेवटी ती एकच अंतिम इच्छा व्यक्त करते ती म्हणजे-

मला पडवीत बसवल्यावर

तू येशीत असावास[२२]

एका मातेनं आपल्या मुलाचा केलेला जप या कवितेत येतो. जीवाच्या आकांताने हृदय कालवून येतं. तिचा टाहो मन वेधून घेतो. ही दीर्घ कविता ग्रामीण जीवन चितारताच एका मातेचे भव्य विश्वच उभे करते.

मोहन पाटील यांचे काव्य लेखन कमी प्रमाणात आहे पण आहे ते सकस आहे. त्यांच्या जाणिवा ग्रामीण आहेत. पण त्या आठवणी स्वरुपात आहेत.त्यामुळे साहजिकच त्यांच्या कवितेत खोलवर ग्राम जीवनाचे चित्रण येत नाही. त्याचप्रमाणे ते शेताशी निगडीत अशी कविताही लिहीत नाहीत. प्रतिमांचा प्रभावी वापर करताना ते दिसतात. त्याबद्दल आनंद यादव म्हणतात 'प्रांजळ स्वभावाची ही कविता सौम्य प्रकृतीची आहे. कल्पतकतेपेक्षा प्रतिमांच्या चमकदार विभ्रमांपेक्षा ती भावनात्मकतेला अधिक जवळ करू पाहते. त्यामुळे ती शांत ज्योतीसारखी तेवणारी व हृदयस्पर्शी झाली आहे. *मातेच्या कविता* मध्ये त्यांच्या या गुणांचा विशेष अविष्कार दिसतो.'[२३]

आनंद यादवांचे म्हणणे त्यांची कविता पाहता योग्य वाटते.

फ.म.शहाजिंदे

शेतकरी (१९८५) हे खंडकाव्य, तर त्या अगोदर निधर्मी (१९७९) हा काव्यसंग्रह व नंतर आदम (१९९१) हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला आहे. मराठ वाड्यातील सासपूर, जिल्हा उस्मानाबाद हे त्याचे गाव. त्यांनी आपल्या काव्यातून शेतकरी जीवनातील व्यथा, वेदना प्रकट केल्या आहेत. *शेतकरी* सारखे खंडकाव्यही त्यांनी लिहिले आहे.

निधर्मी या काव्यसंग्रहात भारतीय समाजातील धर्म व्यवस्था, लोकांच्या धार्मिक कल्पना, अंधश्रद्धा, भोंगळ धार्मिक वाद या सर्व गोष्टींवर प्रकाश टाकताना कवी दिसतो. येथे जात पाहून मैत्री केली जाते. एखाद्याला घरही जात पाहून दिले जाते. कविला एका धर्माचा मानू लागतात, तेंव्हा तो खिन्न होतो. तो स्वत:च्या धर्मनिष्ठेकडे व आपल्या धर्म बांधवांच्या धर्मनिष्ठेकडे डोळसपणे पाहू लागतो. खुदब्या दिवशी नावडत्या कविता पाठ केल्यासारखा नमाज पढतो, हेही त्याला आठवते. आपल्या धर्मातील भोंगळ

धार्मिकता पाहून तो खिन्न होतो. व आपल्या बांधवांना मातम साजरा करण्याची पद्धत शिकव असे अल्लालाच म्हणू लागतो. मुस्लिमांची ज्याप्रमाणे धार्मिकता नष्ट झाली आहे. त्याप्रमाणे हिंदूंचीही धार्मिकता नष्ट झाली आहे. हेही कविच्या लक्षात येते. मग तरीही दंगे का होतात? हा प्रश्न कवीला पडतो... धार्मिक अधार्मिक अशा दंगली का होत नाहीत? हाही प्रश्न कवीला पडतो. देशभक्तीही राहिली नाही. राष्ट्रध्वजाचे फडके झाले आहे असे कवीला वाटते. *निधर्मी* मधील कविता अशा प्रकारे सामाजिक जाणिवांतून निर्माण झाली आहे.

शेतकरी हे खंडकाव्य शेतक-यांच्या व्यथा, वेदना मांडते. एक शेतकरी आपल्या व्यथा, वेदना स्वत:च आपली कर्मकहाणी सांगत आहे. शेतकरी माणूस अघळ पघळ बोलतो. त्याप्रमाणे हाही शेतकरी बोलताना दिसतो. आपल्या मायबोलीतूनच आपली कथा हा शेतकरी सांगतो. निसर्ग, तलाठी, ग्रामसेवकापासून ते तहसिलदार, जिल्हाधिका-यांपर्यंत गावातल्या राजकारण्यांपासून-मंत्र्यांपर्यंत, मजूरांपासून-व्यापा-यांपर्यंत या शेतक-याची कशी मुस्कटदाबी होते याचे तपशिलवार कथन तो या काव्यातून करतो. दैवाचे सारे भोग आहेत ते चुकणार कसे? असेही त्याला वाटते. तरीही आपल्या भोवती घडणा-या घटनांचे तार्किक विश्लेषण तो करतो.

भारताची अर्थव्यवस्था कृषिप्रधान आहे. भारतीय शेतक-याला ब्रिटीशांनी पिळून काढले. स्वातंत्र्योत्तर काळातही यामध्ये फरक पडला नाही. त्याचे प्रतिबिंब या काव्यात पडले आहे. म्हणून त्यांच्या कवितेतील कवी म्हणतो-

सरकारने भीकेच्या जागी पत द्यावी
भीक न देता मालाला भाव द्यावा
म्हंजी समदे सरळ होत्यात...
कोणाचे बी सरकार आले तरी [२४]

उत्पादनावर भाव देणं सरकारकडून होणार नाही. शहाजिंदे यांनी अत्यंत बारकाईने सूक्ष्म निरीक्षण करून ग्रामीण भागातील समाजरचनेपासून परस्पर संबंधांपासून ते सांस्कृतिक मूल्यांपर्यंतचा अभ्यास केला आहे. 'ग्रामीण' 'खेडी' 'शेती' वगैरे शब्दाच्या अधारावर राजकीय जीवन जगणा-या पुढा-यांची या शेतक-याच्या खोल गेलेल्या डोळ्यात डोकावून पहावयाची, राबलेल्या चेह-याची नजर फेकायची. घट्टे पडलेल्या हातात हात घालायची हिंमत चाळीस वर्षात झाली नाही. ती प्रा. फ.म.शहाजिंदे यांनी केली आहे. कंगाल शेतकरी म्हणतो-

जिथं मी सोनं ईकतो

तिथं गव-या कसं विकू

कुठंतरी तोंड काळं करावं

आता इथं हायच काय[२५]

सोन्याचा धूर करणारा शेतकरी कंगाल झाला याला कंगाल कोणी केले? तर ग्रामीण भागातील अनेक घटकांनी. पूर्वी सावकार लुटत. आता सोसायट्या, पतसंस्था, बँका शेतक-यांना लुटत आहेत. विकास योजनेच्या नावाखाली शेतकरी लुटत आहे. शेती करणे हाही शेतक-याच्या दृष्टीने गुंता आहे. त्या शेतक-याला कुणीही समजून घेत नाहीत. ही त्याच्या समस्येत पडणारी भर आहे. म्हणून कवी म्हणतो-

शेतक-यांचं दु:ख

शेती करणं गुंता न्हाई तर मग काय हाय?

आपल्या मनात काय हाय

ते बी आपल्या मुखानं जसंच्या तसं सांगता येत नाही.

आज जरी सांगितलं तरी बी

जे सांगायचं हाय तेच ऐकणा-याला कळतं

ह्येची बी ग्यारंटी नसतीया.[२६]

शेतक-याला दु:ख मांडता येत नाही. मांडलं तरी समजावून घेता येत नाही. अशी अवस्था आहे. एक वेळ दुश्मन परवडेल पण भावकी ही भयानक असते. प्रा.शहाजिंदे या भावकीच्या कलहाचाही उल्लेख करतात.

शेतक-यांच्या अवनतीला, या उद्योगातील, या देशातील शासनाचे धोरण अनेक वेळा कारणीभूत होते. सरकारच्या धोरणाचा शेतकरी बळी आहे. त्यांना आधार देणारी वाटणारी व्यवस्था त्याचाच बळी घेत आहे. हे वास्तव कोणीही नाकारू शकणार नाही.

सरकारी धोरण, योजना यांचा बळी पडणारा शेतकरी, शेतक-याची लूट करणारी केंद्रे, व्यक्ती, शेतक-यांची चळवळ या सर्व बाबींचा विचार शहाजिंदे करताना आढळतात. तरीही त्यांच्या शेतक-याला वाटते. आपली स्थिती सुधारेल. हा आशावाद तो मनाशी बाळगून आहे. म्हणूनच त्यांचा शेतकरी म्हणतो-

जरा नीट इच्यार करा

बगा हामच्याकडं

येणा-या दिसाला तुमी काय

आणि आमी काय अडवू शकत नाही

एक ना एक दिस तुम्ही

हात जोडून झुकून खेड्याकडे याल

खेड्याकडे [२७]

त्यांचा *आदम* हाही काव्यसंग्रह आहे. *आदम* हे पृथ्वीवरील पहिल्या माणसाचे नाव. माणूस देवाच्यामुळे निर्माण झाला. पण त्याला दु:खही सहन करावे लागले. अर्थात यात त्याची काहीही चूक नव्हती. पण शिक्षा भोगणे त्याच्या वाट्याला आले. खरे तर *आदम*ला कोणतीही जात नव्हती. पण आता मात्र माणूस जात व धर्म मिरविताना दिसतो. शहाजिंदे यांचीही व्यथा एकच आहे. ती म्हणजे या धर्मनिरपेक्ष देशात कोणालाही माणूस म्हणून जगता येत नाही. म्हणूनच ते म्हणतात-

अरे बाबा, समुहाला खडसावणाऱ्यांच्या नशिबी उत्सव नसतात

ते समुहाला गोंजारणाऱ्यांच्या नशिबी असतात

मग मला सांग, तुझ्या नशिबी उत्सव कसले असणार?

त्यासाठी इथे कुठलीतरी एकच जात असावी लागते रे!

नुसतं माणूस असणं बरं नसतं राजा!

कारण तो दोन्हीकडून ठेचाळत राहतो रे! [२८]

शेती व्यवस्था भ्रष्टाचाराच्या किती खोल खड्यात अडकली आहे याचे दर्शन *परंपरा* ही कविता घडविते. साखर कारखान्यातील साखर मुंग्या खात आहेत. एकाधिकार खरेदीतील कापूस अग्निदेवतेलाच चढविला जातो. तर दुष्काळग्रस्तांसाठी जमविलेले अन्न घुशी खात आहेत. विहिरी कर्जाच्या पायात चोरीला जात आहेत. चोरच कोतवालांना दटावतोय की तुम्ही इथं कशाला ड्युटी करताय? विविध योजनांमधून लाखोंची खिरापत वाटली जाते. म्हणून तर काही माणसांना भाकरी खायला मिळते. कृष्णानेही सोन्याचीच द्वारका उभारली होती म्हणूनच कवी म्हणतो-

इथली परंपराच अशी आहे की,

सत्ताधाऱ्यांनी इथे श्रीमंतच व्हायला हवे [२९]

असेच या व्यवस्थेचे आहे. जे सत्ताधीश आहेत तेच सुखी आहेत. पण ज्यांच्याकडे सत्ता नाही ते दिवस ढकलण्याशिवाय काही करू शकत नाहीत.

इथे त्यांच्या मायला

पिकविणारा मोठा नाही

तर खरेदी - इक्री करणारा मोठा हाय

माव घारे म्हनलं तर

गोळ्या घालतेत आन वरून

भारत शेती परधान हाय म्हनत्येत!

गेल्या जल्मी शेतक-याने पापं केली होती का हो साहेब? [३०]

या कवितेबद्दल भालचंद्र फडके म्हणतात- 'शहाजिंदे' यांच्या कवितांतून त्यांची दु:खे बोलकी होतात. आणि अभावग्रस्त समाजाच्या गाऱ्हाण्याचे सूरही मोकळे होतात. त्यांची मुख्य व्यथा आहे की, या देशात खरा न्याय मिळू शकणार नाही. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि सामाजिक न्याय ही मानवी मुल्ये कागदावरच आहेत. वास्तवात येथील सामान्य माणसांची मानसिक गुलामगिरी संपलेली नाही.[३१]

'शहाजिंदे' चा गौरव करताना कैलास सार्वेकर म्हणतात- आजच्या शेतक-याचे प्रातिनिधिक आत्मोद्गार असलेल्या या काव्यात त्यांच्या विचारांचा, श्रद्धांचा, समज-अपसमजांचा, एकूण शेतकरी जीवनाचा संपूर्ण पटच मांडला गेला आहे हे मान्य करावे लागेल.[३२]

फ.म.शहाजिंदे सर्व सामान्याची, शेतकऱ्यांची व निधर्मीवादी लोकांची दु:खे सारख्याच ताकदीने मांडतात. शेतकरी या त्यांच्या खंडकाव्यात शेतकऱ्यांची दु:खे सूक्ष्मपणे व परखडपणे त्यांनी चित्रित केली आहेत. रानात व सामाजात तितकाच तन्मयतेने वावरणारा हा समर्थ कवी आहे. चांगली सामाजिक जाणिव असणारा हा कवी आहे.

इंद्रजीत भालेराव

ग्रामीण कवितेतील अलिकडच्या काळातील एक लक्षणीय नाव अतिशय प्रतिकूल परिस्थितीत आपले जीवन व्यथीत करणारा हा ग्रामीण कवी अतिशय ताकदीने ग्रामीण जीवनानुभव आपल्या काव्यामध्ये रेखाटताना दिसतो. आपल्या पहिल्याच काव्यसंग्रहापासून प्रसिद्ध होण्याचे भाग्य इंद्रजित भालेरावांना मिळाले आहे. त्यांचा पीकपाणी-१९८९, आम्ही काबाडाचे धनी-१९९२, कुंळबिणीची कहानी-१९९८ हे

काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. ख-या अर्थाने ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारा व शेतात रमणारा हा कवी ग्रामीण साहित्यातील आशादायक असे नाव आहे.

पीकपाणी हा त्यांचा पहिला कविता संग्रह पण नवीनतेच्या कोणत्याही खुणा त्यांच्या लेखनात दिसून येत नाहीत इतका हा काव्यसंग्रह उत्कृष्ट आहे. त्यांच्यावर संत व महानुभाव वाङ्मयाचे असणारे संस्कार त्यांचा शेती जीवनाशी असणारा निकटचा संबंध यामुळे या काव्यसंग्रहास वेगळेच परिमाण लाभले आहे. अभंग, ओवी, छंदाचा समर्थपणे वापर हेही कवीचे वैशिष्ट्य आहे. काव्यसंग्रहाच्या सुरुवातीलाच आपल्या काव्यातून नेमके काय प्रकट व्हावे हे सांगताना कवी म्हणतो-

माझ्या कवितेला यावा
शेणा-मातीचा दरवळ
तिने करावी जतन
काट्याकुट्यात हिरवळ [३३]

या पहिल्या कवितेतच कवीने आपली जातकुळी स्पष्ट केली आहे. आपण कुणबी घराण्यामध्ये जन्माला आलो आहे याचा त्यांना अभिमान आहे. त्याला कारणही आहे. कुणबी या दुनियेला पोसतो हे कवीला माहीत आहे म्हणून कवी म्हणतो-

निर्मिला
माणूस निर्मिकानं
दुनियेच्या पाठी
कुणब्यांना
आपल्या हिंमतीनं
पोसला पोटी [३४]

परंपरागत कुणबीपण घरामध्ये चालते. पोराबाळापेक्षा मातीवर प्रेम केले जाते हे सांगताना कवी म्हणतो-

गो-या कुंभारानं केला ! मातीमधी बाळकाला
तसा बाप माया करी ! माझ्याकडून मातीवरी
माझं ओलांडून प्रेत ! आधी रुजविलं शेत
मग आला स्मशानात ! काळ्याइचं गाणं गात!! [३५]

गाव व शेत यांचे गोडवे कवी गातो. गावातील पाण्याची रीत जगावेगळी आहे. हे सांगताना कवी म्हणतो-

माझ्या गावाच्या पाण्याचे

खोल जमिनीत झरे

कुणी फाकवा रे माती

झरे होतील पिसारे [३६]

पीक पाणी, तिथले पक्षी, शेतात काम करणारे शेतकरी हेच विषय त्यांच्या काव्यात येतात. पीकावर पाखरांचाही हक्क असतो हे सांगताना कवी म्हणतो-

देवघासा आधी चिमणघास

हा रानाचा वसा असतो

माणसापेक्षा केंव्हाही त्याचा

चिमण्या पाखरावरच भरवसा असतो [३७]

पाऊसही पाहिजे तेंव्हा पडत नाही नको त्या वेळी पडतो व शेतक-याचा घास पळवून नेतो त्याचे वर्णन करताना कवी म्हणतो-

आलं आले हे आभाळ आलं सुगीच्या दिसांत

माती कालविली यानं दानामधल्या धानात [३८]

गावातही आता बदल होत आहे. गावं ओस पडत आहेत.

गाव पंढरी ओस झाली

गावावरून फिरताहेत गाढवांचे नांगर

आतडी गोळा करून कुंथा काढणारे बैल

पाय खोदताहेत होऊन डंगर [३९]

तरीही मातीत गावात रमणारा हा कवी आहे म्हणून तो स्वत:च मातीची थोरवी गाताना म्हणतो-

मातीसटीच जगावं

मातीसटीच मरावं

माती लई थोर

तिला कसं इसरावं [४०]

शेत, माती, गाव याची माहिती सांगणारा, शेतक-याची जीवन गाथा गाणारा हा कवी. वास्तववादी ग्रामीण जीवनाचे चित्रण हे त्याचे वैशिष्ट्य. रचनेत कोणताही चमकदारपणा नाही तर साधी सोपीही रचना करताना कवी दिसतो.

त्यांच्या पीक पाणी कविता संग्रहाबद्दल नागनाथ कोतापल्ले म्हणतात- 'तरल निसर्गाबिष्कार आणि प्रसन्न व्यक्तिमत्व यामुळे त्यांची कविता लक्षणीय ठरली; परंतु त्याचबरोबर हेही लक्षात आले की, या कवीला आपल्या सर्व परंपरांचे उत्तम भान आहे. जीवनातल्या, संस्कृतीतल्या आणि मराठी कवितेच्या परंपरांचे भान त्यांनी आपल्या काव्यलेखनामधून फार उत्तम रीतीने प्रकट केले आहे.'[४१]

तर पु.ल.देशपांडे म्हणतात- 'रचनेतील सहजता आणि जिव्हाळ्याच्या बोलीभाषेत वाचकाशी साधला जाणारा संवाद यामुळे ही जाणीवपूर्वक केलेली काव्यरचना न वाटता अनुभवाच्या बीजातून सहज फुललेल्या कोंभासारखी वाटते. तिला एक स्वयंभूपण लाभलेलं आहे.'[४२]

आम्ही काबाडाचे धनी या काव्य संग्रहात कवी आपली जीवनकहानी निवेदन करतो. ही कहाणी आत्मनिवेदन करणारी असली तरी ग्रामीण जीवनातील दाहक अनुभव तेथे व्यक्त झाला आहे. शेतक-याच्या कुटुंबात जन्माला आलेल्या या मुलाचा जन्म खरोखरंच शेतात होतो. कोणतेही सुईणीशिवाय त्याची आई त्याला जन्म देते. जन्मापासूनच शेतीचा थेट संबंध येत जातो. पुढे लहानपणापासूनचे अनुभव कवी रेखाटतो. एकदा मातीचा बैल केला, तो सुरेखच झाला. त्याचे वर्णन कवी करतो-

माती झाली सजीवंत
जणू लागती बोलाया
घडविली हुबेहुब
जीत्या बईलाची काया[४३]

अनेकांची नजर लागून हा बैल फुटला. आईने बाळाची समजूत काढली. एकदा गावातल्या गुरुजीच्या पोराचं अंगडं बघितलं. तसेच अंगडं घेण्याचा हट्ट कवी करू लागला. बापानं कापूस विकल्यावर अंगडं घेण्याचं कबूल केलं. पोरानं स्वत: कापूस वेचला. व्यापाऱ्याकडे गेल्यावर फक्त चिट्ठ्याच हाती आल्या. कर्जामध्ये सर्व पैसे वळते झाले. कवीची निराशा झाली म्हणून तो म्हणतो-

सात जलम केलं पाप
आलो कुणब्याच्या पोटी

कोन पळवून नेतो

आम्ही भाजलेली रोटी[४४]

या गरीब पोराचे दोनाचे चार हात करण्याचे मायबाप ठरवितात. त्यावेळी कवीला आपल्या पत्नीचा विरह निसर्गमाध्यमातून दिसून येतो. लग्नानंतर पत्नीला दिवस गेल्यावर आपल्या पोटी शिवाजी यावा असे वाटू लागते.

आसा कुणब्याच्या पोटी

पुन्हा येऊदे शिवाजी

रीन मातीचं फेडाया

देवराया झाला राजी[४५]

पण त्याची गर्भवती पत्नी पुराच्या पाण्यात वाहून जाते. कवीचे सर्व स्वप्नच भंग पावते.

एक जीवन कहाणी साध्या सोप्या बोली भाषेत कवी रेखाटतो. निसर्ग प्रतिमांच्या भाषेत कवी समर्पकपणे आपली जीवन कहाणी सांगताना दिसतो. येथेही कवीचे मातीशी असणारे दृढ नाते पुन्हा एकदा प्रकट होते.

कुळंबिणीची कहाणी मध्ये अशाच प्रकारे एका कुळंबिणीची कहाणी चित्रीत झाली आहे. जिच्या जन्माचे कोणालाही कौतुक नव्हते. म्हणून कवी म्हणतो-

मल्या जल्माचा आनंद

नाही कोणालाच झाला

एक पहार उशिरा

सूर्य आभाळात आला[४६]

आजीने माया ममतेने तिला मोठं केलं तिच्याबद्दल आदर व्यक्त करताना ती कुळंबिण म्हणते-

तिच्या माया ममतेनं

सारी जिंदगी जगले

भुंड्या माळ रानावर

झाडं व्हवून वागले[४७]

लहानपणी खोडकर वृत्तीत ही कुणबिण वाढते. आई बापाबरोबर शेतात काम करते. बहिणीबरोबर खेळते. एकदा खेळता-खेळता बहीण उपाशीच झोपली. रात्री भुकेने उठली तर घरात भाकरीच नाही अशी

अवस्था. शेवटी माय कोपली. शेवटी ही उपाशीच झोपली. अशीच ती मोठी होते. चार लेकींच्या पाठीवर पाचवी ही जन्मली होती. त्यामुळे बापाला प्रत्येक पोरीच्या लग्नाच्या वेळी इख पचवावं लागतं. बाप हिंमत हरत गेला पण आईनं हिंमत हरली नाही. शेवटी तिचं लग्न ते करतात. त्यावेळी ती कुणबिण म्हणते-

एका दिसी दारामध्ये
आलं वरातिचं घोडं
चढले मी एकदाचा
नको वाटलेला चढ [४८]

नवरा लंबा चौडा होता. नाकी डोळी नीट होता. स्वभावाने धीट होता. पण जिथं दिलं होतं तेथे मात्र सुबत्ता नव्हती.

उम्हाट्याचा गाव सारा
कोरड्वाहूची भुई
रया गेलेली माणसं
हाडं निघालेल्या गायी [४९]

या ठिकाणी तिचा जीव उदास व्हायचा. तरी ती तिथे राहिली. अगदी उन्हाळ्यात खायालाही मिळालं नाही तरी तेथेच राहिली. सासरा व्यसनी व बाहेरख्याली म्हणून पोरगा त्याला मारतो. मग तो शेतात काम करतो. पण घरातली लक्ष्मी वाढल्यावर पुन्हा बिघडतो. इकडे तिच्या पोटी वंश वाढू लागतो. त्याचवेळी तिची आवडती आजी मरते. त्याचं तिला आतोनात दु:ख होतं. त्याच दु:खाच्या आवेगात तिचा गर्भपात होतो. तिला वाटतं नीट चाललेल्या गाड्याला खीळ कशानं लागली. पण पुढे चार गर्भपात झाले तेंव्हा सासू व नव-याची माया आटली. शेवटी तिला एकदाचं मूल होतं. सासू व नवरा पुन्हा प्रेम करू लागतात. तरी तिला वाटते बाईचा जन्म वाईटच. म्हणून ती म्हणते-

बाईचा जलम जसा
चुकून झालेला
त्याच नेमक्या येळला
देव उठून गेलेला [५०]

असा हा प्रतिभावंत कवी *आम्ही काबाडाचे धनी* व *कुळंबिणीची कहाणी* सारख्या दीर्घ कविता व पीकपाणीसारखा काव्यसंग्रह ही त्यांची समृद्ध काव्य निर्मिती. ग्रामीण जीवनातील तळागाळातील लोकांची

जीवन कहाणी चित्रीत करताना ते दिसतात. शेत, गाव, गरीब लोकांचे जीवन ग्रामीण लोकसंकेत रुढी परंपरांच्या आधारे चित्रीत करताना ते दिसतात. त्यांच्या काव्यांतही कोणतीही घटना निसर्ग प्रतिमांतूनच साकार होते. काबाडाचे धनी मध्ये पत्नीचा विरहही असाच साकार झाला आहे. त्यांच्या संपूर्ण काव्यावर दृष्टी टाकली की एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे त्यांनी कवितेसाठी वापरलेली भाषा ही बोली भाषा आहेच पण ती अतिशय शुद्ध आहे. एकही इंग्रजी शब्द ते काव्यात येऊ देत नाहीत. अलिकडच्या काळात काव्याच्या बाबतीत हे दुर्मिळ उदाहरण आहे. तर असा हा उच्च प्रतिमेचा एक प्रज्ञावंत कवी म्हणून इंद्रजीत भालेरावांच्या कडे पाहिले पाहिजे.

प्रदीप पाटील

प्रदीप पाटील हे मराठीचे प्राध्यापक असणारे, इस्लामपूरला राहणारे एक कवी. त्यांचे 'आत्मसंवाद' (१९९६) व नुकताच 'अंतरीचा भेद' (२००२) असे दोन कविता संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. ग्रामीण भागातून वर आलेल्या या कविला ग्रामजीवनाची कल्पना असली तरी, त्यांच्या सर्वच कविता ग्रामजीवनाचे दर्शन घडवीत नाहीत. परंतु, काही कवितांतून ग्राम जीवनाचा अनुभव ते प्रकट करतात.

पावसासाठी आसुसलेल्या रानाचे कवी वर्णन करतो. सा-या आभाळात ढग पाहून रान हरकून गेलं. पण धारा सुटला जोराचा व ढग दूर गेले. त्याचवेळी सांजवेळ आंधार घेऊन आली. रानाला मात्र आभाळाची ओढ होती म्हणून त्याने-

रात काढली रानानं

डोळं उघडं ठेऊन [५१]

रान पावसाला म्हणते तुझ्या येण्याचे पुरे झाले कौतुक. तुझा भरवसा नाही हे मला पुरतं आहे ठाऊक. रानाचा जीव पावसासाठी कासावीस होतो. पण पावसाला हे कळत नाही. कारण-

नाही बोलून फायदा

तुझा झाला रे माणूस [५२]

रानाचे पावसाशी असणारे नाते काही ठिकाणे कवी शृंगारिक पद्धतीनेही वर्णन करतो. पाऊस रात्रीच्या मध्यान्ही आला म्हणून सामसूमही भांबवली. मातीच्या उफाड्याच्या देही तो रिमझिम स्वरुपात उतरला. पावसामुळे मातीला दिवस गेले. तिची कुस उजवली. या निसर्गाच्या करणीला कवी म्हणतो-

असं नक्षत्राचं लेणं

जातो देऊन पाऊस [५३]

काही ठिकाणी कवी शेतक-यांची दु:खेही चित्रित करतो. शेतकरी दुनियेच्या पोटाची खळगी भरतो. पण स्वत: कर्जात जन्मतो व कर्जातच मरतो. उन्हा पावसात शेतकरी मातीत कष्ट करतो. या कष्टाच्या टाहोनेच आकाशाला पाझर फुटतो. या पाझराने स्वप्न मोहरले की, पुन्हा आनंदाने तो झुलतो. हुरड्यात पीक आल्यावर शेतकऱ्याची अवस्था तरण्या ताठ्या पोरीच्या बापासारखी होते. डोंगरासारखी दु:खं सोसून पीक काढतो. पण मालाला भाव मात्र नसतो. मग त्याच्या स्वप्नांचा गाव उजाड होतो. म्हणून तो म्हणतो-

आयुष्यच असते आमुचे

कर्जाचे कोरीव लेणे

मेल्यावर सरणाचेही

डोक्यावर असते देणे [५४]

तर आणखी एका कवितेत शेतक-याचे दु:ख शेतकरी अशाच पद्धतीने सांगतो. जन्मापासून शेतात राबून आमची दिवाळी फाटक्या कपड्यातच होते. जन्मापासून पाचवीला दैन्य पुजले. रानच्या वा-यात पिंड पोसला गेल्यामुळे झुंजण्याची धमक त्याच्या छातीत आहे. कष्ट मातीत करताना जन्म मातीमोल झाला. व आपल्या खोपीतला आंधार गेला नाही असे त्याला वाटते. तर ४६ व्या कवितेतही अशाच आशयाचे शेतकरी आपल्या दु:खाचे गा-हाणे गातो. त्यांच्या कवितेबद्दल प्रा. म.द.हातकणंगलेकर म्हणतात-

'त्यांच्या कवितेत प्रांजळता, प्रासादिकता, सामाजिक वास्तवाची जाण आणि व्यक्तिगत तारुण्यसुलभ संबंधातला हळूवारपणा ही सर्व प्रसादचिन्हे त्यांच्या कवितेत आहेत.'[५५]

अंतरीचा भेद या काव्य संग्रहातही *आत्मसंवाद* काव्यसंग्रहातील कवितेप्रमाणे कविता आहेत. त्यात अधिक व्यापकपणा आहे. यातही काही कवितांमध्ये शेतकऱ्याचे दु:ख आले आहे. एका कवितेत शेतकरी म्हणतो आम्ही रान पिकवतो पण आमच्या हाती काही लागत नाही. बारा महीने साडेसाती मागे लागते. सावकारी फास गळ्याभोवती आवळतो आहे. अशा परिस्थितीत त्याच्या -

माझ्या देही वेदनेची

आग पसरते [५६]

आपल्या बापाची शेतातली राबणूकही कवी एका कवितेत प्रकट करताना दिसतो. वारकऱ्याचा नेम चुकेल पण शेतात जाण्याचा नेम वडिलांचा चुकणार नाही असे कवी म्हणतो. जगणं मातीमोल व्हायची वेळ आली तरी मातीवरची निष्ठा कमी झाली नाही. मातीनंच परिस्थितीशी टक्कर द्यायचं बळ दिलं. तो रानाबरोबर माणसं पेरायला शिकला. पण तरीही-

पण माणुसकी मात्र

उगवता उगवत नाही[५७]

त्यांच्या या कवितांबद्दल दिलीप पुरुषोत्तम चित्रे म्हणतात- 'ही कविता सामाजिक भान व्यक्त करणारी कविता आहे पण ती इतकी साधी, काहीही आक्रस्ताळेपणा न करता अत्यंत हळूवारपणाने, अत्यंत टोकदारपणाने व्यक्त करते; 'या कवितेचा अस्सलपणा पटकन लक्षात येतो.'[५८]

प्रदीप पाटील हे मराठी काव्यातील नवीन नाव. सामाजिक जाणिवेने लिहिणारा हा कवी स्वत:शी आत्मसंवाद करत आपला अंतरीचा भेद सांगत हा कवी सर्वसामान्यांची दु:ख गाथाही गातो. सामाजिक भान चांगल्या प्रकारे व्यक्त करणारा हा कवी ग्रामीण जीवनानुभव मात्र सूक्ष्मपणे व जिवंतपणे चित्रीत करण्यात अपयशी ठरतो. त्यापेक्षा अंतरीचा भेद सांगणेच पसंत करतो.

श्रीकांत देशमुख

श्रीकांत देशमुख यांचा *बळिवंत* हा काव्यसंग्रह सन १९९७ साली प्रसिद्ध झाला व त्याची दुसरी आवृत्ती-२००२ साली काढावी लागली. यावरून त्या कवितेची लोकप्रियता लक्षात येते. काव्यसंग्रहाच्या नावावरुनच हा काव्यसंग्रह शेतकरी जीवनाविषयी असणार हे लक्षात येते, प्रत्यक्षात तसेच आहे.

बळिवंत मधील प्रत्येक कविता, अभंग, कृषिजीवनाची व्यथा, वेदना मांडणारी आहे. ही वास्तववादी कविता शेतक-याचे चढउतार डोळ्यासमोर ठेवून त्याचे चित्रण करते. शेतकरी जीवनाबरोबर कवी आपली कहानीही सांगतो. शेतक-याचे आयुष्य शेतामध्ये माती ओढणा-या बैलासारखेच आहे. शेतक-याचे जीवन म्हणजे शेतात राबणे, घाम गाळणे आणि परिस्थितीत भरडले जाणे असेच असते. म्हणूनच कवी म्हणतो त्यांना सुखाचे दिवस नसतात त्यासाठीच कवी म्हणतो-

बारमाही राबणा-या जीवानं पुसू नयेत दिवस हंगामाचे

बुडतो दिवस कोणत्या मावळतीला घेऊ नये अंदाज याचा

बैल ओढतो पोट ओढावं आयुष्य तसंच

हंबरू नये बैलानं थारोळ्यातल्या पाण्याच्या नावानं[५९]

ज्या गावात शेतकरी राहतो ते गाव तर कसं आहे

खेड

असणाराचं

नसणाराचं

जमीनदाराचं

भूमिहीनाचं

गाव माणसाची प्रेतं

खांद्यावर वाहून नेणारं

खेडं सर्वांचं[६०]

कापसाला दर आला नाही म्हणून कापसावर फवारण्याचं औषध पिऊन मरण्याची वेळ शेतक-यावर येते. त्यावेळी कवीला वाटते माणसावर पडणा-या रोगावर वापरण्याजोगं वेगळं औषध आता उरलं नाही. पाऊसही पीक वाळल्यावर पडून जातो. म्हणजेच शेतक-याची कोंडी फक्त शोषितच करीत नाही तर निसर्गही त्याला हातभार लावतो. मग त्याच्या हाती आत्महत्येशिवाय दुसरा पर्याय राहत नाही. पिकाला पोटच्या पोराप्रमाणे शेतकरी वाढवतो. पण ते पीक त्याला रोटीही देऊ शकत नाही. त्यातच शेतक-याचं आयुष्य संपतं. हा खेळ कसा चालतो हे सांगताना कवी प्रतिमा-प्रतीकाच्या साह्याने म्हणतो-

सडवून घ्यायचं असतं हाडकुळं शरीर

पेरायची असतात हाडं

ओलेत्या मातीत त्यांना

सुदृढ कुत्र्यांची पिढी प्रसवण्यासाठी

जी करेल रक्षण घरादाराच्या मिंतीचं[६१]

तरीही राबता राबता माती ओली झाली व सर्व नातीगोती दुरावली. अशा वेळी एकटेपणा असह्यच. पण हे भोग त्याला मुकाट्याने भोगावे लागतात. घाम गाळणा-या हाती दुसरं काहीही नसतं फक्त घाम गाळणं एवढंच त्याच्या हाती असतं. निसर्ग आज ना उद्या साथ देईल या आशेवर तो जगत राहतो. त्याला स्वत:च्या पोटाचीच काळजी असते असे नाही तर-

चोच खोप्यात रिकामी ओंजळीत नाही पाणी

कसा पोसावा दाणा ढगात रुसलं पाणी

पोटात आटलं पाणी माठात मेलं पाणी

दारात फुटके रांजण ओठात सुकलं पाणी[६२]

तरी हा बळिवंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याचा प्रयत्न करतो. त्याच्या गुराढोरांना जखमा होतात. शेती नापीक करणा-या तशातही तो दाणा रुजवतो कारण पाखरांच्या अस्तित्वासाठी. शेतकऱ्याचा हा लढा कायम चालूच राहतो. या शेतकऱ्याचा आणि मातीचा ऋणानुबंध असतो. दिवसभर काम करतो व रात्री ढेकूळ होऊन फुटतो. हे मातीशी नाते असेच आहे कारण-

बळिवंत आम्ही मातीतले दास

धरलेली कास मरणाची[६३]

अशी बळिवंताची कर्मकहाणी सांगणारी कविता कवीने अतिशय समर्थपणे रेखाटली आहे. शेतकरी त्याच्यासमोर असणारी नैसर्गिक व मानवनिर्मित संकटे , त्याचा त्या संकटाशी होणारा सामना, त्याच्या व्यथा, वेदना व त्याची हतबलता त्याचप्रमाणे नवी पिढी शिकून स्वत:चे भलं करताना दिसते. हे सर्व निसर्ग प्रतिमातून, प्रतिकातून कवी मांडतो. या कवितेबद्दल राजन गवस म्हणतात- 'या कविता जगण्याचा तळ तणावासह शोधतात. त्यामुळेच, समूह भावना, कृषिमूल्य व्यवस्था, दु:ख-दारिद्रय, तुटलेपणा ही या कवितेची मध्यवर्ती आशयसूत्रे बनतात. शेतक-याचे संपूर्ण जगणेच एक दीर्घ अभंग बनते. त्यामुळे आपली जातकुळी, पूर्वपरंपरा तुकारामाची आहे याची भरीव आठवण ही कविता देते.'[६४]

श्रीकांत देशमुख यांची कविता बळिवंताचा आरसा आहे असे म्हणणे योग्य होईल. एक प्रतिभावंत व जाणकार कवी म्हणून त्यांचा उल्लेख करायला हवा. अभंग छंदाचा समर्थपणे वापर कवीने केला आहे हेही उल्लेखनीय होय.

समकालीनमध्ये नारायण सुमंत यांचे वेगळेपण

कवी नारायण सुमंत यांच्या समकालीन कवी मधील काही निवडक कवींच्या कवितेचे स्वरुप आपण पाहिले. या प्रत्येक कवीचे काही वेगळेपण आहे. त्यातील काही कवी नारायण सुमंतांपेक्षा सामाजिक जाणिव चांगल्या रीतीने प्रकट करणारे आहेत. तर काही शेतकरी जीवन चांगल्या प्रकारे रेखाटणारे आहेत. तर काही कवींच्या पेक्षा नारायण सुमंत हे शेतकरी जीवनाशी व निसर्गाशी अधिक

रमतात. हे सर्व कवी वेगवेगळ्या प्रदेशामध्ये वास्तव्य करणारे आहेत. त्यामुळे त्यातील काहीजण आपले प्रादेशिक भान चांगल्या रीतीने जपताना दिसतात. या सर्वांशी तुलना करता कवी नारायण सुमंतांचे वेगळेपण काय आहे याचा आपण विचार करू.

निसर्ग व वास्तववादी कवी यांचा सुंदर मिलाफ त्यांच्या कवितांमध्ये दिसून येतो. *रानमैरी* या काव्यसंग्रहामध्येच (त्यांचा पहिला काव्यसंग्रह) हे त्यांचे वैशिष्टय दिसून येते. या काव्यसंग्रहामध्ये तीन विभाग आहेत. त्यातील *रानमैरी* या पहिल्या विभागात निसर्गाचे शृंगारपूर्ण वर्णन ते करतानाच त्याचप्रमाणे मानवी प्रेम / शृंगारही निसर्ग प्रतिमांच्या माध्यमातून रेखाटतात. तर त्यातील दुसरा विभाग *झाडे* यामध्ये पूर्णपणे झाडाचे स्वरुप, वैशिष्टय, महात्म्य, मानवांशी झाडांचा सहसंबंध, त्याचे दातृत्व याबद्दल ते लिहिताना दिसतात. म्हणजेच या कविता पूर्णपणे निसर्ग कविता आहेत. तर *मुक्तछंद* या विभागात वास्तववादी कविता आहेत. शेतकरी जीवन, दुष्काळ यांचे वास्तववादी चित्रण ते करताना दिसतात. तर *वृक्षवेद* हा पूर्णपणे निसर्ग कवितांचा संग्रह आहे. त्यामध्ये ते वृक्षांशीच संवाद साधताना दिसतात. *रानमैरी* तील *झाडे* या विभागातील कवितांचा हा मुक्त व समृद्ध अविष्कार आहे. येथे नारायण सुमंतांचे एक निसर्ग कवी म्हणून एक वेगळेच रुप साकारते. *सातबारा* या काव्यसंग्रहामध्ये शेतकरी जीवन, त्यांच्या व्यथा, वेदना त्यांचे दु:ख, त्यांच्यावर होणारा अन्याय, दुष्काळ याविषयी सविस्तरपणे आपले विचार अविष्कृत करताना कवी दिसतो. या सर्व कविता वास्तववादी स्वरुपाच्या आहेत. म्हणजेच त्यांच्या एकूण काव्याचा विचार करता त्यांच्यामध्ये निसर्ग कवी व वास्तववादी कवी यांचा सुंदर मिलाफ झालेला आहे.

नारायण सुमंत यांनी *वृक्षवेद* मध्ये वृक्षांवर सविस्तर विवेचन केले आहे. वृक्षांचे स्वरुपवर्णन, वैशिष्टये, त्यांचा निसर्गाशी असणारा सहसंबंध, त्यांचे महात्म्य, झाडाच्या वेदना, त्यांचा अंत, मानव निसर्ग सहसंबंध, कलमी झाडाचे विशेष गुण, बागेतील झाडांचे वेगळेपण या सर्व बाबींचा कवी येथे सविस्तर विचार करतो. म्हणजेच, झाडाच्या जन्मापासून त्याच्या मृत्यूपर्यंत घडणाऱ्या सर्व गोष्टींचा सविस्तर विचार कवी करतो. अगदी अंकुराचे दु:ख कोणते, कलमी झाडाचे वेगळेपण कोणते, बागाळलेल्या झाडांचे वैशिष्टय काय हेही कवी सांगतो. या सर्व कवितांचा बारकाईने विचार केला तर एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे कवीचे झाडांच्या बाबतीत असणारे निरीक्षण अगदी सूक्ष्म आहे. इतके सूक्ष्मपणे व इतक्या विस्तृतपणे झाडाचे वर्णन, वैशिष्ट्ये व्यक्त करताना मराठीतील इतर कोणताही कवी दिसत नाही. हे नारायण सुमंतांचे वेगळेपण आहे. कवी वृक्षांशी इतका एकरुप झाला आहे की तो वृक्षाळलेला वाटतो. वृक्षांशी इतके तादात्म्य पावलेला हा कवी आहे हे या कवीचे वेगळेपण आहे. सुमारे १२५ कवितांच्या द्वारे हा

विचार कवी मांडताना दिसतो. वृक्षाला मानवी जीवनात अतिशय महत्वाचे स्थान आहे. मानव - मानव बनण्यापूर्वीपासूनच त्याचा झाडाशी संबंध होता. प्राचीन काळी तर वृक्षाला अतिशय महत्व होते. कारण वृक्ष मानवाची निवारा व अन्नाची गरज भागवीत होता. हे लक्षात घेतले तर कवी सुमंतांनी वृक्षाचा केलेला विचार महत्वाचा वाटतो. आजही मानवी जीवन वृक्षांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहिले आहे. म्हणूनच, झाडांची सर्व वैशिष्ट्ये कवी मांडतोच. पण त्याचबरोबर कवी त्यांची महतीही गातो. येथेही एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, फक्त झाडांवर १२५ कविता लिहीणे अवघड गोष्ट आहे पण हे आव्हानही कवीने पेलले आहे. त्यांनी या कवितांमध्ये सारखे पणा येणार नाही याचीही काळजी घेतली आहे.

झाडे एकच गुन्हा करतात,
आभाळभर हात पसरून
आयुष्यभर पाऊस मागतात
आणि-
तोडणाऱ्यांच्या चुलींसाठी
पानोपानी
वाढत जातात![६५]

असे झाडांचे महात्म्य गाणारा कवी मराठी भाषेत विरळाच.

लोकसंस्कृती, ग्रामसंस्कृतीच्या खुणाही त्यांच्या काव्यात उमटतात. वृक्षांचे पूजन ही आपली संस्कृती होती. पण त्यातूनच पुढे काही प्रथा पडल्या. उदा.वटसावित्री पूजन हेही ते ध्वनीत पद्धतीने सांगताना दिसतात. घाव घालणाऱ्याच्या मुखी ऊस साखर देतो. ही लोकसंस्कृतीही ते सांगतात. सटीच शिपणं, सूने अशा काही लोकसंस्कृतीच्या खुणा त्यांच्या काव्यात उमटतात. *वृषभ सहस्रनाम स्तोत्र* सारख्या कवितेत प्राचीन काळापासून शोषण करणारा वर्ग ते स्पष्टपणे दाखवून देतात. त्यात काही देवही आहेत. 'उतू नये मातू नये घेतला वसा टाकू नये' अशी लोकपरंपराही ते सांगतात. त्याप्रमाणे रात्रभर जोंधळ्याची खुडणी करण्याची शेतकऱ्यांची रीतही ते आपल्या कवितेत मांडतात. अशा पद्धतीने त्यांच्या कवितेत लोकसंस्कृती, ग्रामसंस्कृतीचे दर्शन घडते.

ग्रामीण बोलीचा वापर ते आपल्या काव्यामध्ये करतात. त्यामुळे काव्याची आशय घनता वाढते. 'पाने खडळणे', 'वढाळ डोळे', 'शिराळ', 'दिस', 'कुडी', 'पाखरू', 'व्हटात', 'धान', 'उफाड्यातलं चांदणं', 'हिर्वी', 'सपान', 'मोट', 'ओढाळ', 'रामपार', 'शिलकी', 'दाणा', 'घाट', 'इकान', 'धाप', 'बीमोड

होणे', 'भुंडेमाळ', 'पुनव', 'भरवसा', 'वांझ', 'डुया', 'चरका', 'सूने', 'सटीचं शिंपणं','खंगलेले','बेणं','उताण खाट' अशा अनेक बोली भाषेतील शब्दांचा वापर कवी करतो. यातले अनेक शब्दांना प्रमाण भाषेत अर्थही मिळणार नाहीत अशी अवस्था आहे. परंतु, हे शब्द शेतकरी लोकांच्यामध्ये रुढ झालेले आहेत. शेतक-यांच्या तोंडी असणाऱ्या शब्दांचा वापर कवी करताना दिसतो. काही नवीन शब्दांचा उपयोगही कवी करतो. उदा. झाडांच्या मुळ्या दगडांशी संघर्ष करतात. त्यासाठी कवी 'पाषाण झुंज' हा शब्द वापरतो. एखाद्याने बंड करणे यासाठी कवी 'तुकारामने' हा नवीनच शब्द वापरतो. तुकारामांनी बंड केले होते, यासाठी हा शब्द ते झाडासाठी वापरतात. अशा प्रकारे ग्रामीण बोलीतले शब्द, काही नवीन शब्द कवी वापरताना दिसतो.

प्रतिमांचा सढळ वापर हे एक कवीचे वैशिष्टय आहे. पूर्वी कवितेमध्ये कवी उपमा, रुपक यासारखे अलंकार योजायचे आजकाल मात्र कवी प्रतिमेच्या सहाय्याने आपणास जाणवणारे भास, कल्पना यांचा परिचय करून देतो. नारायण सुमंतही प्रतिमांचा वापर करताना फक्त व्यक्तच प्रतिमा ते वापरत नाहीत तर अव्यक्त प्रतिमा ते वापरतात. उदा.'वृक्षांचे आकाशव्यापी डोळे' त्याशिवाय सुधीर रसाळ ज्याप्रमाणे पाच प्रकारच्या प्रतिमा सांगतात.[६६] त्या दृक, नाद, गंध, स्वाद व स्पर्श या सर्व प्रकारच्या प्रतिमा ते वापरतात. नारायण सुमंत वैशिष्ट्य पूर्ण व विविध अशा प्रतिमांचा वापर करतात. याचा आपण सविस्तर विचार प्रकरण क्र.तीन मध्ये केला आहेच. त्यांच्या प्रतिमांची काही उदाहरणे येथे पाहू. 'व्हटात पूनव होणे', 'दिस गंधाळणे', 'जरतारी काळोख', 'गव्हाळ पाणी', 'उफाड्यातलं चांदणं', 'हिर्वी माया', 'मायेची पाखर','चांदण्यांच पीक','उंबराच फूल','वय पिकणे','झुंबर गाणे','चांदण हात', 'थेंबाचा उरुस','चतकोर चंद्र' अशा काही प्रतिमा - प्रतिके कवी वापरतो. या प्रतिमा वापरताना आशयाचे भान कवी ठेवतो. म्हणूनच प्रतिमांचा समर्पक वापर हे त्यांच्या लेखन शैलीचे वैशिष्टय होय.

कवितेच्या शेवटच्या दोन ओळीत त्या कवितेला कलाटणी देणे हे तंत्रही ते वापरतात. विशेषत: *सातबारा* या काव्यसंग्रहात त्यांनी प्रभावीपणे हे तंत्र वापरले आहे. त्यामुळे कवितेला वेगळेच शरीरसौष्ठत्य प्राप्त होते. हेही त्यांचे वैशिष्ट्य मानले पाहिजे.

त्यांच्या काही प्रेमकविताही आहेत. *रानमैरी* या पहिल्या काव्य संग्रहातील काही कवितांमधील हा प्रेमभाव दिसून येतो. अर्थात त्यांच्या एकूण कवितांच्या तुलनेत या कविता फारच कमी प्रमाणात आहेत. त्यांच्या सुमारे १८० कवितांपैकी फक्त १५ ते १६ कवितांमध्येच हा प्रेमभाव दिसून येतो. या कविता सुरुवातीच्या काळातील आहेत. त्यामुळे सर्वच कवी - लेखकांच्या बाबतीत जसे सुरुवातीच्या काळात

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

कोणत्यातरी पूर्वसुरीच्या कवी - लेखकाचा प्रभाव दिसून येतो. त्याप्रमाणे नारायण सुमंत यांच्या कवितांवरही ना.धों. महानोर सारख्या काही कवींचा प्रभाव दिसून येतो.

तुझ्या बगून साजाला
भान आभाळाचं गेलं,
हळदी दिठीवर तुझ्या
त्येनं चांदणं पेरलं। [६७]

अशा प्रकारे त्यांच्या कवितांत निसर्ग कवितांच्या माध्यमातून हा शृंगार चित्रित होतो. पण एकूण नारायण सुमंतांच्या कविता पाहता या प्रेमकविता काव्य गुणांना कमी प्रतीच्या ठरतात. त्याच त्याच निसर्ग प्रतिमांच्या आधारे शृंगार चित्रित करण्याचा प्रयत्न कवी करतो. पूर्व सुरींच्या कवींचा प्रभाव, दुर्बोधता या काही गोष्टींमुळे या कविता सरस ठरत नाहीत. अर्थात त्यांच्या अशा कविता फारच कमी प्रमाणात आहेत. या प्रभावातून सुमंत लगेच बाहेरही पडले आहेत, हे त्यांचे भाग्य होय. नंतरच्या कवितांतून हा प्रभाव ही नाही व प्रेमभावही नाही. परंतु तरीही त्यांच्यावर काही समीक्षकांनी महानोर आदी कवींचे अनुकरण करणारा कवी असाजो शिक्का मारला आहे तो अनाठायी आहे.

कवी नारायण सुमंत यांचा *सातबारा* हा काव्यसंग्रह त्यांच्या एकूण काव्यलेखनाला वेगळी दिशा देणारा ठरेल असे वाटते. कवी म्हणून त्यांच्या संक्रमण स्थितीतले सर्व टप्पे ओलांडले आहेत व आता एका प्रगल्भ व स्थिर अशा वळणावर ते उभे आहेत असे या काव्यसंग्रहावरून वाटते. या कवितेमध्ये कवीने शेतक-यांची दु:खे, त्यांच्या व्यथा, वेदना, त्यांच्यावर होणारा अन्याय, त्यांच्या समस्या प्रभावीपणे /८८/ चित्रित केली आहेत. यावरुन कवीची शेतकरी जीवनाची जाण परिपूर्ण आहे असे दिसून येते. ते सूक्ष्मपणे शेतक-यांच्या व्यथा, वेदना, समस्या मांडतात. निसर्ग,समाज, शासन, प्रशासन, बाजारपेठ, फसवा विज्ञानवाद या सर्वांचा शेतकरी जीवनाशी असणारा संबंध, त्यांचे ताण-तणाव *सातबारा* त कवी प्रभावीपणे रेखाटताना दिसतो. शेतक-यांवर होणारा अन्याय परंपरागत आहे. हा अन्याय सत्ययुगापासून लोकयुगापर्यंत होत होता. या अन्यायाचा बदला म्हणून शेतकरी आपल्या बैलांना शोषित लोकांची नावे ठेवून आसूड ओडतो व समाधान करून घेतो. हा वेगळा विचारही ही कविता सांगते. शासकीय योजनांची अंमलबजावणी कशी फसवी असते *सौ. हरितक्रांती* सारखी कविता सांगते. तर धरणाचे पाणी लोकांना देण्याचे खोटे आश्वासन सरकार नेहमी कसे देते हे *चित्र* सारखी कविता चित्रित करते. तर विज्ञानवाद कसा फसवा आहे हे ही 'उपग्रहप्राप्त' ही कविता सांगते. बाजारपेठेवर त्यांनी अनेक कविता लिहिल्या आहेत.

बाजारपेठ व त्यांचा शेतक-यांना बसणारा फटका कवी वाचकांसमोर आणतो. 'एकातरी पिढीने', 'संशोधन', 'फळ' अशा काही कवितांमधून बाजारपेठ व शेतक-यांना त्यांचा बसणारा फटका चित्रित झाला आहे. त्यांचा शेतकरी फक्त आपली वेदना मांडत नाही तर प्रस्थापितांच्या विरूध्द बंडाची भाषाही करतो. शेतकरी संघटना व त्यांच्या चळवळी यांचा परिपाक म्हणजे ही भाषा होय. 'मैरू, हैबती आणि दौलती या कवितेत अन्यायाविरूध्द हे शेतकरी बंड करताना कदाचित-

उद्या ते जोडाही भिरकावतील

सार्वभौम संसदेच्या दिशेने।[६८]

अशी बंडखोराची भाषा मराठी कवितेत नवी आहे. याशिवाय गरीब व श्रीमंत शेतक-यांचा भेद ते *ग्रीन हाऊस* सारख्या कवितेत मार्मिकपणे दाखवून देतात. दुष्काळ हा कवी ज्या प्रदेशात राहतो त्या प्रदेशात नेहमीच वास करणारा. त्यामुळे सहाजिकच त्यांच्या कवितेत दुष्काळ हा येणारच. त्यांच्या *जिराइत संध्याकाळी, सुगी, बामळी वरल्या* या कविता दुष्काळाचे चित्रण करतात. तर, *माढा : एक संदर्भ* ही तर दुष्काळावरील एक उत्कृष्ठ कविता आहे. *वृक्षवेद* मधील १०२ क्रमांकाची कविता पाणी प्रश्नावरील मराठीतील मोजक्या कवितांपैकी एक कविता. वृक्षांच्या माध्यमातून त्यांनी हा पाणी प्रश्न मांडला आहे. १९९८ च्या महाराष्ट्र टाइम्सच्या दिवाळी अंकात ही कविता प्रसिध्द झाली व पुढे ही न्यू योर्क टाइम्समध्ये ही इंग्रजीतून अनुवादीत होऊन प्रसिध्द झाली. तर त्यांच्या 'कवी' ही कविता इ. ११ वी च्या मराठी पाठ्यपुस्तकात समाविष्ठ करण्यात आली आहे. 'तमाम कष्टक-यांचा गौरव करणारी पहिली कविता' असा गौरव पाठ्यपुस्तक मंडळाने या कवितेचा केला आहे. या शिवाय राजकीय भाष्य करणा-याही काही कविता *सातबारा* मध्ये आहेत.

सातबारा मध्ये उपरोध व उपहासपूर्ण शैलीचा त्यांनी अतिशय परिणामकारकपणे वापर केले आहे. शेतक-यांच्या आत्महत्याबद्दल विधानसभेत चर्चा चालते त्यावेळी उत्तर मिळते-

कृषिप्रधान राष्ट्रात

शेतक-यांनी आत्महत्या करायची नाही-

तर मग कुणी ? [६९]

अशी उपरोधपूर्ण व उपहासपूर्ण भाषा ते वापरताना दिसतात.

नारायण सुमंतांच्या कवितांचा विचार करता आणखी एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे त्यांच्या कवितेची समीक्षा परीपूर्ण पध्दतीने झाली नाही. त्यांच्या वृक्षवेद काव्यसंग्रहावर तर समीक्षक लिहितच

नाहीत. अपवाद फक्त सौ.हेमलता गायकवाडांचा. त्या म्हणतात- ते सर्वच कवितांतून झाडांचे आदिमपण स्पष्ट करताना दिसातात..... पर्यावरणासारखा शास्त्रविषय झाडाच्या रुपाने मांडण्यात कवी यशस्वी झाला आहे.[७०] बाकी सर्व समीक्षकांनी *माढा एक संदर्भ व मरवसा* या दोनच कवितांवर समीक्षा लिहिलेली दिसते.

समकालीन कवींचा विचार करता अनेक समकालीन कवींपेक्षा नारायण सुमंतांचे वेगळेपण आहे. निसर्ग व वास्तववादी कवितेचा अनोखा मिलाफ त्यांच्यासारखा कोणालाही जमला नाही. वृक्षांशी एकरुपता स्पष्ट करणारा, त्याचे गोडवे गाणारा, त्यांचे सौंदर्य प्रकट करणारा त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या व्यथावेदना समर्थपणे मांडणारा हा कवी मराठी ग्रामीण कवितेत एक वेगळा ठसा उमटवतो यात शंकाच नाही.

प्रकरण चार

संदर्भ

१ नारायण कुलकर्णी - कवठेकर, हे माझ्या गवताच्या पात्या, मुंबई, मौज प्रकाशन गृह, १९८२, प्रथमावृत्ती, पृष्ठ - ७

२ तत्रैव, पृष्ठ - २

३ श्रीकांत गोंधळेकर, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अंक क्र.३०४, जाने., फेब्रु., मार्च- २००३, पृष्ठ - ७२

४ रविंद्र ठाकूर, प्रवाह आणि प्रतिक्रिया, औरंगाबाद, स्वरुप प्रकाशन, १९९९ प्रथमावृत्ती, पृष्ठ-८९

५ उत्तम कोळगांवकर, जंगलझडी, मुंबई, मौज प्रकाशन गृह, १९८२, प्रथमावृत्ती, पृष्ठ - २

६ तत्रैव, पृष्ठ - २५

७ तत्रैव, पृष्ठ - ४४

८ तत्रैव, पृष्ठ - २३

९ तत्रैव, पृष्ठ - ६६

१० तत्रैव, पृष्ठ - ४२

११ तत्रैव, पृष्ठ - ३७

१२ तत्रैव, पृष्ठ - १०६

१३ तत्रैव, पृष्ठ - ४३

१४ रविंद्र ठाकूर, प्रवाह आणि प्रतिक्रिया, उ.नि., पृष्ठ - १३९

१५ आनंद यादव, ग्रामीणता - साहित्य आणि वास्तव, पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, प्रथमावृत्ती, पृष्ठ - १३६

१६ मोहन पाटील, सौ.विणा मोहन पाटील, आवृत्ती नाही, साल नाही, पृष्ठ - १

१७ तत्रैव, पृष्ठ - २

१८ तत्रैव, पृष्ठ - ४

१९ तत्रैव, पृष्ठ - ६

२० तत्रैव, पृष्ठ - २४

२१ तत्रैव, पृष्ठ - २४

२२ तत्रैव, पृष्ठ - २८

२३ तत्रैव, पृष्ठ - नाही

२४ फ.म.शहाजिंदे, शेतकरी, औराद - शहाजानी, आंतरभारती प्रकाशन - १९८५, आवृत्ती नाही, पृष्ठ - १३८

२५ तत्रैव, पृष्ठ - १

२६ तत्रैव, पृष्ठ - ६३

२७ तत्रैव, पृष्ठ - २५२

२८ फ.म.शहाजिंदे, आदम, औराद-शहाजानी, आंतरभारती प्रकाशन, १९९१, प्रथमावृत्ती, पृष्ठ-२३

२९ तत्रैव, पृष्ठ - १९

३० तत्रैव, पृष्ठ - ३०

३१ तत्रैव, पृष्ठ - ७

३२ कैलास सार्वेकर, मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास, पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९९९, प्रथमावृत्ती, पृष्ठ - २२२

३३ इंद्रजीत भालेराव, पीकपाणी, पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, २००१, चौथी आवृत्ती, पृष्ठ - ९

३४ तत्रैव, पृष्ठ - १५

३५ तत्रैव, पृष्ठ - १०

३६ तत्रैव, पृष्ठ - १४

३७ तत्रैव, पृष्ठ - १९

३८ तत्रैव, पृष्ठ - १३

३९ तत्रैव, पृष्ठ - २८

४० तत्रैव, पृष्ठ - ११

४१ नारायण कोतापल्ले, पीकपाणी सप्रेम, संदर्भ आणि समीक्षा (संपा-केशव देशमुख), कोल्हापूर, प्रियदर्शिनी प्रकाशन, २००३, प्रथमावृत्ती, पृष्ठ - ३६

४२ तत्रैव, पृष्ठ - ८९

४३ इंद्रजीत भालेराव, आम्ही काबाडाचे धनी, परभणी, बी.रघुनाथ प्रकाशन, १९९२, प्रथमावृत्ती, पृष्ठ - १०

४४ तत्रैव, पृष्ठ - २१

४५ तत्रैव, पृष्ठ - ३९

४६ इंद्रजीत भालेराव, कुळंबिणीची कहानी, परभणी, प्रतिभास प्रकाशन, १९९८, प्रथमावृत्ती, पृष्ठ - ७

४७ तत्रैव, पृष्ठ - ९

४८ तत्रैव, पृष्ठ - ३५

४९ तत्रैव, पृष्ठ - ४२

५० तत्रैव, पृष्ठ - ६७

५१ प्रदीप पाटील, आत्मसंवाद, पुणे, मानसन्मान प्रकाशन, १९९६, प्रथमावृत्ती, पृष्ठ - ३७

५२ तत्रैव, पृष्ठ - ४८

५३ तत्रैव, पृष्ठ - ४९

५४ तत्रैव, पृष्ठ - ४०

५५ तत्रैव, पृष्ठ - नाही

५६ प्रदीप पाटील, अंतरीचा भेद, मुंबई, अभिधानंतर प्रकाशन, २००२, प्रथमावृत्ती, पृष्ठ - ३०

५७ तत्रैव, पृष्ठ - ३९

५८ तत्रैव, पृष्ठ - नाही

५९ श्रीकांत देशमुख, बळिवंत, परभणी, लोकविद्या प्रकाशन, २००२, दुसरी आवृत्ती, पृष्ठ - १

६० तत्रैव, पृष्ठ - ६

६१ तत्रैव, पृष्ठ - ११

६२ तत्रैव, पृष्ठ - ३९

६३ तत्रैव, पृष्ठ - ६७

६४ तत्रैव, पृष्ठ - ७२

६५ नारायण सुमंत, रानभैरी, करमाळा, अनुराधा प्रकाशन, १९८३, प्रथमावृत्ती, पृष्ठ - ३९

६६ सुधीर रसाळ, कविता आणि प्रतिमा, मुंबई मौज प्रकाशन गृह, १९८२, पहिली आवृत्ती, पृष्ठ - १९९

६७ नारायण सुमंत, रानभैरी, उ.नि., पृष्ठ - २१

६८ नारायण सुमंत, सातबारा, पुणे, श्रीविद्या प्रकाशन, २००२, प्रथमावृत्ती, पृष्ठ - ४३

६९ तत्रैव, पृष्ठ - १४

७० हेमलता गायकवाड, आधुनिक मराठी ग्रामीण कविता, कोल्हापूर, फडके प्रकाशन, १९९७, प्रथमावृत्ती, पृष्ठ - १००